शनिवार, १३ एप्रिल २०२४
⊙ किमत ५ रुपये | छत्रपती संभाजीनगर (महाराष्ट्र)
⊙ मराठी ⊙ दैनिक
⊙ वर्ष - ०३ ⊙ अंक - २२८
⊙ आरएनआय : एमएएचएमएआर/२०२१/८२५६६

# आधुनिक केसरी

विश्वव्यापी मराठी दैनिक

●MARATHI ●DAINIK ●CHHATRAPATI SAMBHAJINAGAR (MAHARASHTRA) SATURDAY 13 APRIL 2024 | adhunikkesari.com | ●YEAR-03 ●ISSUE-228 ●RNI : MAHMAR/2021/82566 ●PAGE-12 ●PRICE-05


## बुलढाण्याचे डॉ. शरद जुमडे यांना आधुनिक केसरीचा वैद्यकीय सेवेतील 'आयडॉल महाराष्ट्र' पुरस्कार जाहीर

आधुनिक केसरी न्यूज

**गोकुळसिंग राजपूत**

**बुलढाणा :** येथील सुप्रसिद्ध दंततज्ज्ञ तथा इंडियन डेंटल असोसिएशनचे अध्यक्ष डॉ. शरद जुमडे यांचे वैद्यकीय सेवेतील कार्य निश्चितच कौतुकास्पद आणि गौरवास्पद आहे. या कार्याची दखल घेऊन आधुनिक केसरीचा वैद्यकीय सेवेतील 'आयडॉल महाराष्ट्र' हा पुरस्कार डॉ. शरद जुमडे यांना जाहीर करण्यात आला आहे.






आधुनिक केसरीने 'आयडॉल महाराष्ट्र' पुरस्काराची घोषणा केलेली होती. त्यासाठी वेगळी वाट चोखाळणाऱ्या मान्यवरांचे प्रस्ताव मागवण्यात आले होते. यात इंडियन डेंटल असोसिएशनचे अध्यक्ष डॉ. शरद जुमडे यांचा प्रस्ताव प्राप्त झालेला होता.

या प्रस्तावावर आधुनिक केसरीच्या निवड समितीने विचार करत बुलढाणा येथे त्यांच्या दंत हॉस्पिटलला भेट देऊन पाहणी केली व डॉ. शरद जुमडे यांच्याकडून त्यांच्या कार्याची संपूर्ण महिती घेतली. डॉ. शरद जुमडे यांनी बुलढाणा जिल्ह्यात विविध ठिकाणी ग्रामीण भागातील गरजू रुग्णांसाठी आरोग्य शिबिरे घेऊन रुग्णसेवा केली. तसेच ग्रामीण भागात आरोग्यविषयक जनजागृतीसाठी पदरमोड करून विविध उपक्रम यशस्वीरित्या राबवले. कोरोना काळात गरजू रुग्णांसाठी मोफत उपचार करून समाजात एक वेगळा आदर्श निर्माण केला. रक्तदान शिबिरे आयोजित करून कोरोनो काळात मोठ्या प्रमाणात निर्माण झालेला रक्ताचा तुटवडा भरून काढण्यात डॉ. शरद जुमडे यांनी मोलाचे कार्य केले. समाजात आरोग्याविषयी पसरलेल्या अंधश्रद्धा दूर करण्यासाठी त्यांनी विविध माध्यमांतून प्रबोधनात्मक कार्य केले.

बुलढाणा जिल्ह्यातील सर्व सामाजिक उपक्रमात डॉ. शरद जुमडे यांचा पुढाकार असतो. त्यांचे हे कार्य निश्चितच इतरांसाठी प्रेरणादायी असून त्यांच्या या वेगळ्या वाटेवरील प्रवासाबद्दल आधुनिक केसरीने त्यांना वैद्यकीय समाजसेवेतील 'आयडॉल महाराष्ट्र' पुरस्कार घोषित केलेला आहे. लवकरच छत्रपती संभाजीनगर येथे होणाऱ्या सन्मान सोहळ्यात त्यांना या पुरस्काराने सन्मानित करण्यात येणार आहे. या पुरस्काराबद्दल समाजातील विविध स्तरातून डॉ. शरद जुमडे यांचे अभिनंदन होत आहे.


## संदीप मोरे यांना दैनिक आधुनिक केसरीचा शासकीय सेवेतील 'आयडॉल महाराष्ट्र' पुरस्कार जाहीर

आधुनिक केसरी न्यूज

**सागरकुमार झनके**

**जळगाव जा. :** जळगाव जामोद पंचायत समितीमध्ये कार्यरत विस्तार अधिकारी तथा साहाय्यक गटविकास अधिकारी संदीप मोरे यांना आधुनिक केसरीचा शासकीय सेवेतील 'आयडॉल महाराष्ट्र' पुरस्कार जाहीर करण्यात आला आहे.






विस्तार अधिकारी असताना संदीप मोरे यांनी शासनाच्या विविध योजना, उपक्रम यशस्वीपणे राबवले. सामाजिक कार्य, त्याचबरोबर तालुक्यातील घरकुल लाभार्थ्यांना जागा उपलब्ध करून नियमानुकुल करून देऊन त्यांच्या जागेचा महत्त्वाचा प्रश्न सोडवला आहे. पंडित दीनदयाळ उपाध्याय घरकुल जागा खरेदी अर्थसाह्य योजनेतून अनेक लाभार्थ्यांना जागेचा मोबदला म्हणून 50 हजार रु. पर्यंत मदत मिळवून दिली. कोरोना काळात रक्तदान शिबिरे घेणे, गरीब गरजूंना अन्नधान्य पुरवणे, अशी अनेक कार्ये त्यांनी केली आहेत. अधिकारी पदावर असूनही त्यांनी सामाजिक बांधिलकी जपत समाजातील शेवटच्या घटकासाठी महत्त्वपूर्ण कार्य केले आहे, म्हणूनच त्यांच्या कार्याची दखल घेत महाराष्ट्र शासनाचा गुणवंत पुरस्कार, राज्यस्तरीय भूषण पुरस्कार अशा अनेक पुरस्कारांनी त्यांना सन्मानित करण्यात आले आहे. त्यांनी पंचायत समिती जळगाव जामोद येथे गटविकास अधिकारी पदाचा तसेच महिला बालविकास प्रकल्प अधिकारी पदाचा कार्यभारसुद्धा सांभाळून शासनाच्या विविध योजना यशस्वीरित्या राबवल्या आहेत. गरीब, गरजू विद्यार्थ्यांना, स्पर्धा परीक्षा देणाऱ्या विद्यार्थी यांनासुद्धा मार्गदर्शन, सोबतच आर्थिक साहाय्यसुद्धा करण्यात येत आहे. अनेक विद्यार्थीसुद्धा संदीप मोरे यांनी दत्तक घेतले असून त्यांचा सर्व खर्च मोरे हे उचलत आहेत. त्यांच्या कार्यकर्तृत्वाची दखल घेत आधुनिक केसरी वृत्तपत्र समूहाच्या वतीने विविध क्षेत्रांत उत्कृष्ट कार्य करणाऱ्या व्यक्तींचा शोध घेऊन संदीप मोरे यांना आधुनिक केसरीचा शासकीय सेवेतील राज्यस्तरीय 'आयडॉल महाराष्ट्र' पुरस्कार देण्यात येत आहे. लवकरच या पुरस्काराचे वितरण संभाजीनगर येथे होणार आहे. विशेष म्हणजे हा पुरस्कार त्यांच्या वाढदिवसाच्या दिवशीच जाहीर झाला आहे. त्यामुळे सर्वच स्तरातून त्यांच्यावर अभिनंदनाचा वर्षाव होत आहे.

# वंचितला मतदान करू नका : तुषार गांधी

आधुनिक केसरी न्यूज

**पुणे : भाजपाच्या युतीला गद्दारांची युती म्हटले पाहीजे. या गद्दारांच्या युतीचा पराभव करण्यासाठी महाविकास आघाडीचा विजय झाला पाहीजे. यासाठी एमआयएम आणि वंचित बहुजन आघाडीला मतदान करू नये, असे आवाहन महात्मा गांधी यांचे पणतू तुषार गांधी यांनी केले. एका वृत्तवाहिनीला दिलेल्या मुलाखतीत तुषार गांधी यांनी वंचितवर हल्लाबोल केला.**





तुषार गांधी पुढे म्हणाले की, आमची कितीही चांगली मैत्री असली तरी जे चूक आहे, त्याला स्पष्ट चूकच म्हणायची वेळ आता आली आहे. यापूर्वी जी चूक झाली, तीच पुन्हा होऊ शकते. डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी दिलेले संविधान जपायचे असेल तर ही शेवटची संधी आहे, असे आवाहनही यावेळी तुषार गांधी यांनी केले. वंचित बहुजन आघाडीचे प्रमुख प्रकाश आंबेडकर यांची महाविकास आघाडीसोबत जागावाटपाची चर्चा निष्फळ ठरल्यानंतर वेगळी चूल मांडत स्वतंत्र निवडणूक लढविण्याची घोषणा केली. तसेच त्यांनी मविआच्या विरोधात उमेदवारही उभे केले. त्यांच्या या निर्णयावर मविआकडून सावध भूमिका घेण्यात आली. मात्र तुषार गांधी यांनी वंचित बहुजन आघाडीच्या पवित्र्यावर सडकून टीका केली आहे. त्यामुळे इतिहासातील प्रसिद्ध अशा 'आंबेडकर विरुद्ध गांधी' या वादाची पुन्हा एकदा महाराष्ट्राला आठवण झाली आहे.

### पलटूरामांबाबत त्यांचे काय म्हणणे आहे?

तुषार गांधी यांच्या टीकेला वंचित बहुजन आघाडीचे मुख्य प्रवक्ते सिद्धार्थ मोकळे यांनी प्रत्युत्तर दिले आहे. मोकळे म्हणाले की, प्रस्थापित पक्ष आणि त्या पक्षांच्या राजकारणाला मदत करणारे सहयोगी घटक शोषित आणि वंचितांचे राजकारण उभे राहू नये यासाठी सातत्याने प्रयत्न करत आले आहेत. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांना सुद्धा याच पद्धतीने विरोध झाला होता. त्यांनाही इंग्रजांचे हस्तक असल्याचे दाखविण्याचा प्रयत्न झाला होता. तेच नरेटिव्ह आता प्रकाश आंबेडकर यांच्याबाबतीत वापरला जात आहे. ज्या शोषित, वंचितांना राजकारणात येऊ दिले जात नाही, ज्यांच्या पालापर्यंत लोकशाही पोहचू दिली जात नाही, त्या घटकांना प्रकाश आंबेडकर मुख्य प्रवाहात आणू इच्छित आहेत, हे इथल्या प्रस्थापितांना सहन होत नाही. तुषार गांधींना आमचा प्रश्न आहे की, भाजपामध्ये गेलेले, भाजपामधून काँग्रेसमध्ये आलेले आणि इकडून तिकडे उड्या मारणाऱ्या पलटूरामांबाबत त्यांचे काय म्हणणे आहे? महाविकास आघाडीमधील तीनही पक्षांपैकी कुणीही उद्या भाजपाबरोबर जाणार नाही, याची खात्री तुषार गांधी देऊ शकतात का? आम्हाला बी टीम म्हणणं सोपे आहे. मात्र यांच्याकडचे नेते कधी तिकडे जातील, हे सांगता येत नाही. ज्या काँग्रेसच्या बाजूने तुषार गांधी नेहमी बोलत असतात, त्या काँग्रेसचा प्रवक्ता परवा शिंदे गटात गेला. त्याबाबतीत तुषार गांधींचे काय म्हणणे आहे? माजी मुख्यमंत्री अशोक चव्हाण भाजपामध्ये जातात आणि खडसे निवडणुकीच्या तोंडावर राष्ट्रवादी सोडून पुन्हा भाजपामध्ये जात आहेत, यावर तुषार गांधी यांचे काय म्हणणे आहे?", अशा प्रश्नांचा भडीमार सिद्धार्थ मोकळे यांनी केला.

### चर्चेतील बातमी

## इराण इस्त्रायलवर हल्ला करणार ?

आधुनिक केसरी न्यूज

**नवी दिल्ली :** आधी युक्रेन-रशिया युद्ध, त्यानंतर हमासमुळे गाझापट्टीत सुरू झालेले इस्त्रायलचे हल्ले त्यामुळे जगभरात अनिश्चिततेचे वातावरण तयार झाले होते. त्यानंतर आता पुन्हा एकदा जगावर युद्धाचे सावट घोंगावत असल्याचे समोर आले आहे. इराण पुढच्या ४८ तासांत इस्त्रायलवर हल्ला करू शकते, अशी शक्यता वॉल स्ट्रिट जर्नलने व्यक्त केली आहे. इराणमधील नेत्यांच्या सूत्राच्या हवाल्याने वॉल स्ट्रिट जर्नलने ही माहिती दिली आहे. इराण आणि इस्त्रायल दरम्यान तणाव निर्माण झाल्यानंतर भारतीय परराष्ट्र मंत्रालयाने एक महत्त्वाची सूचना दिली आहे. भारतीय नागरिकांनी पुढचे आदेश येईपर्यंत इराण किंवा इस्त्रायलमध्ये प्रवास करू नये, असे परराष्ट्र मंत्रालयाने सांगितले आहे. तसेच सध्या या दोन देशांत जे भारतीय नागरिक राहत आहेत, त्यांनी तात्काळ तिथल्या भारतीय दूतावासाशी संपर्क साधून स्वतःची नोंदणी करावी, असेही निर्देश दिले आहेत. इराण आणि इस्त्रायलचे शत्रूत्व नवे नाही. इस्त्रायल आणि हमासमध्ये संघर्ष पेटल्यानंतर इराण युद्धात उतरणार, अशी चर्चा होती.

# हुकूमशाही प्रवृत्ती संसदीय लोकशाहीला मारक : डॉ. श्रीपाल सबनीस

आधुनिक केसरी न्यूज




**पुणे :** अस्थिरतेच्या वातावरणात कोणत्याही समाजाची, प्रांताची वा देशाची प्रगती होत नाही. आज जगभरात अस्थितरतेचे वातावरण वाढतआहे. लोकशाही प्रक्रियेतून निवडणूक आलेले लोक हुकूमशाही प्रवृत्तीने वागत आहेत. रशियाचे पुतीन, चीनचे जिनपिंग व अमेरिकेचे बायडेन आधुनिक काळातील हिटलरप्रमाणे वागत आहेत. भारतातहीया हुकूमशाही प्रवृत्तीचा शिरकाव होत आहे. ही प्रवृत्ती संसदीय लोकशाहीलामारक आहे, असे प्रतिपादन ८९ व्या अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलन व पहिल्या विश्वबंधुता संमेलनाचे अध्यक्ष डॉ. श्रीपाल सबनीस यांनी केले.

बंधुता लोकचळवळीच्या सुवर्णमहोत्सवी वर्षानिमित्त राष्ट्रीय बंधुता साहित्य परिषद, बंधुता प्रतिष्ठान, काषाय प्रकाशन, रयत शिक्षण संस्थेचे औंध येथील डॉ. बाबासाहेब आंबेडकर महाविद्यालय, भोसरी येथील भगवान महावीर शिक्षण संस्थेचे प्रीतम प्रकाश महाविद्यालय आणि भारतीय जैन संघटनेचे वाघोली येथील कला, विज्ञान व वाणिज्य महाविद्यालय या संस्थांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित पहिल्या विश्वबंधुता साहित्य संमेलनाचे उद्घाटन डॉ. श्रीपाल सबनीस यांच्या अध्यक्षतेखाली झाले.

नवी पेठेतील एस. एम. जोशी सभागृहात झालेल्या संमेलनावेळी उद्घाटक रयत शिक्षण संस्थेचे कार्याध्यक्ष चंद्रकांत दळवी, बंधुताचार्य प्रकाश रोकडे, स्वागताध्यक्ष कृष्णकुमार गोयल, ज्येष्ठ समाजवादी विचारवंत प्रा. सुभाष वारे, डॉ. विजय ताम्हाणे, मधुश्री ओव्हाळ, प्रा. चंद्रकांत वानखेडे, डॉ. अशोककुमार पगारिया, डॉ. अरुण आंधळे आदी उपस्थित होते. मधुश्री ओव्हाळलिखित 'सम्यक सत्यार्थी' पुस्तकाचे, नंदा कोकाटे लिखित 'पुकार बंधुतेची' काव्यगीताचे प्रकाशन यावेळी झाले. वासंती मेरू (पलूस), पूजा विश्वकर्मा (पुणे), भाग्यश्री बगाड (गुजरात), राम तरटे (नांदेड), चंद्रशेखर महाजन (अकोट), पल्लवी पतंगे (मुंबई), प्रकाश पाठक (संभाजीनगर), गजानन गायकवाड (सिल्लोड), युवराज पाटील (कोल्हापूर), सुरज दिघे (तळेगा), सीमा झुंजारराव (मुंबई) यांना 'बंधुता शब्दक्रांतीसाहित्य पुरस्कार' प्रदान करण्यात आला. दुपारच्या सत्रात प्रा. चंद्रकांत वानखेडे यांच्या अध्यक्षतेखाली 'अभिजात मराठी काव्यपंढरी' कविसंमेलन झाले. यामध्ये संगीता झिंजुरके, डॉ. बंडोपंत कांबळे, प्रा. संतोष काळे यांच्यासह राज्यभरातून निमंत्रित कवी सहभागी झाले होते. उमरखेड येथील सचिन शिंदे यांना प्रकाशयात्री साहित्य पुरस्कार, संभाजीनगर येथील विजयकुमार पांचाळ यांना प्रकाशपर्व साहित्य पुरस्कार, तर मुखेड येथील तुकाराम कांबळे यांना प्रकाशगाथा साहित्यगाथा पुरस्कार देऊन सन्मानित करण्यात आले. तसेच बंधुता काव्यप्रतिभा पुरस्काराने विविध कवींचा सन्मान करण्यात आला. डॉ. श्रीपाल सबनीस म्हणाले, "समाजातील प्रत्येक माणूस हा बंधुतेने जोडलेला आहे. स्वातंत्र्य, समतेसाठी कायदा करता येतो, मात्र बंधुतेचा कायदा करता येत नाही. ती प्रत्येकाच्या मनातून रुजायला हवी. जातीय, धार्मिक वाद बंधुतेमुळे संपतील. भारतीय संस्कृतीचा आत्मा म्हणजे बंधुता व करुणा आहे. धर्म ही संकल्पना मर्यादित असून, आपल्यातील माणूसपण महत्वाचे आहे. सर्व धर्मग्रंथ, महापुरुष बंधुतेची शिकवण देतात. त्यामुळे या महापुरुषांच्या चांगल्या गोष्टींची बेरीज करत त्यातून समाजाचा, देशाचा विकास साधायला हवा.

# उगवतीचे रंग




विश्वास देशपांडे
संपर्क क्र. 9403749932


आधुनिक केसरी

## फिटे अंधाराचे जाळे

त्यात आपल्याला सगळी माहिती मिळेल. ' मी त्यांना म्हटले, ' मी आमच्या वाचनालयात हे पुस्तक उपलब्ध आहे का ते बघतो, नसेल तर पुण्याहून मागवून घेतो. ' यावर ते म्हणाले, ' तुमचा पत्ता कळवा. मी पुस्तक पाठवतो. ' आश्चर्य म्हणजे तीनचार दिवसांनी मला त्यांनी पाठवलेले पुस्तक मिळाले सुद्धा ! त्या पुस्तकावर त्यांनी छानशी स्वाक्षरी करून लिहिले होते, ' विश्वासरावांना आवडेलच या विश्वासाने.' ते सगळं पाहून माझा त्यांच्याविषयीचा आदर आणखीनच दुणावला. करमरकर काकांशी बोलताना ते ज्या परिस्थितीतून जात आहेत त्याचा अंदाज मला आला होता. करमरकर काका आणि काकू दोघेही वयोवृद्ध. एकुलतं एक अपत्य म्हणजे वल्लरी. तीही चारचौघींसारखी सामान्य नाही. वल्लरी आता पन्नास वर्षांची झालीय. आपण सामान्य माणसे आपल्याच फूटपट्ट्या लावून सगळ्यांना मोजत असतो. तसाच मीही विचार करायला लागलो. कोण बरं सांभाळेल आता यांना या वयात ? म्हातारपणाची काठी ज्याला आपण म्हणतो असा मुलगा नाही. अर्थात मुली पण हल्ली मुलांपेक्षा काही कमी नाहीत. पण इथे तर सारेच विपरीत ! आईवडिलांची काळजी घेण्याऐवजी या मुलीचीच काळजी त्यांना घ्यावी लागते. घरामध्ये तिघेच राहतात. जेवणाचा डबा शेजारून येतो. पण निराशा, दुःख, हताशपणाचे उद्गार ? छे ! निराशा, दुःख, उद्वेग कुठेही नाही. दैवाला दोष देणे नाही. करमरकर काका भरभरून बोलले. आपल्या बोलण्यातून आनंद, दुःख, विषाद या सारख्या भावना सहजपणे समोरच्या व्यक्तीला लक्षात येतात. पण इथे तर करमरकर काकांच्या बोलण्यातून आनंदच झिरपत होता. तो थेट माझ्या हृदयापर्यंत पोहोचला. मी मनाशी म्हटले, ' अरे बघ, आपण किती साध्या साध्या गोष्टींवरून चिडचिड करतो, वैतागतो, दैवाला दोष देतो. इथे बघ. किती विपरीत परिस्थिती असताना ही माणसे आनंदात आहेत ! आपल्या वागणुकीचा आदर्श इतरांसमोर ठेवून दिव्याने दिवा लावावा तसा यथाशक्ती परिसर उजळत आहेत. दिवाळी तर नुकतीच संपली होती.

# हितगुज





पुष्प ३८वे

गुरुमाऊली परमपूज्य अण्णासाहेब मोरे, दिंडोरी (नाशिक)

## पुन्हा संत आणि राष्ट्रपिता गांधी

वेदांत भारतीय जीवनाची मूळ बैठक आहे. त्यात आत्मविस्तार, आत्म जागरण, परमप्रेम, ईश्वरानुसंधान, चराचराचे एकात्म व्यक्त झाले आहे. हे सार्वकालिक, सार्वभौमिक सत्य आहे. या सत्याचा ध्यास संतांनी घेतला तसेच वैज्ञानिकांनी देखील आत्मदर्शन असो किंवा वैज्ञानिक संशोधन ते कधीही सीमाबद्ध, एका समूहासाठी नसते ते वैश्विक व कालातीत असते. संकुचित मर्यादांनी गुरफटलेल्या मनांना मोकळा श्वास घेता यावा, त्यांना अथांग खोली, अमाप उंचीचे स्वप्न पडावे. त्यांना या सृष्टीतल्या चैतन्याचा सदैव बोध व्हावा, स्वार्थाचे धागे तोडून निर्भयता व मुक्तीचा अनुभव मिळावा, यासाठी प्रत्येक काळात महान व्यक्ती समाजाचे मार्गदर्शन करीत असतात, भरकटलेल्या समाज मनाला ते योग्य दिशा दाखवीत असतात म्हणून त्यांचे चिंतन, विचार सुद्धा प्रत्येक काळाला मार्गदर्शक, गरजेचे असतात. महात्मा गांधी, गाडगे महाराज, संत तुकडोजी आज पुन्हा प्रकर्षाने समाज मनावर प्रभाव टाकताहेत. हृदये हृदयाशी जोडण्यासाठी, राष्ट्रभक्ती सक्रिय होण्यासाठी, दीनांचे आधार बनण्यासाठी, दीन हीनांच्या उद्धारासाठी, मानवतेच्या प्रसारासाठी, समानतेला वास्तवात आणण्यासाठी, त्यागातून अनुकूल घडविण्यासाठी, माणसातला नारायण जागा करण्यासाठी या महान व्यक्तिमत्त्वांची गरज आहे. दारिद्र्य, अज्ञान, निसर्ग आपत्ती व राजकारण यांनी होरपळलेल्या गावांना, हताश, खचलेल्या ग्रामीणांना त्यांच्या विचारातून उभारी देणे, जीवनशक्ती वाढवणे, संगठीत कार्यातून नवनिर्माणाची ध्यास जडवणे, फार गरजेचे आहे. त्यासाठी शासकीय आदेशांची गरज नाही. चांगल्या कामासाठी, समाजाच्या मदतीसाठी थोडा वेळ बाजूला काढण्याची व या वेळेचा सत्कारणी उपयोग होईल, अशा मार्गदर्शनाची गरज आहे. हे मार्गदर्शन या संतांच्या, महात्म्यांच्या विचार-चिंतनातून, ग्रामअभियानासारख्या ऊर्जस्वीत संकल्पातून मिळणार आहे.


संकलन : बाजीराव सोनवणे, नाशिक
संपर्क क्र. ९९२२४२००३४



# आनंदी पहाट

## उपासना हा साधनमार्गातील एक महत्वाचा प्रकार

आधुनिक केसरी



विद्यावाचस्पती विद्यानंद
संपर्क क्र. 7709612655

मानवी जीवन वेळेनुसार मोजले जाते आणि सूर्य, चंद्र तसेच पृथ्वीचे चक्र हेच मुळी वेळ म्हणून ओळखले जाते. काळाव्दारे आपल्याला वर्ष, महिना, आठवडा, दिवस, तास, मिनिट, सेकंद आणि त्यातील काही भाग कळतात. प्रत्येक वेळी आपल्याला वस्तूंच्या गतीची गणना करण्यासाठी त्याची काहीना काही मदतच होते.
सद्यःस्थितीत त्या सर्वच बाबी काळाच्या ओघात बदलल्या आहेत. वेळ हा आपल्या आजूबाजूला घडणाऱ्या सर्व गोष्टींशी निगडीत असतो, म्हणून आपण अनेकदा वेळेच्या परिमाणाबद्दल ऐकतो. वेळ हा जीवनाचा एक आवश्यक आणि अविभाज्य घटक आहे. वाढदिवस, वर्धापनदिन आणि बाळांचा जन्म यासह अनेक बाबतीत वेळ विशेष टप्पे दर्शवते आणि आपल्याला आपले दैनंदिन जीवन तसेच क्रियाकलाप आयोजित करण्यात मदत करते. जेणेकरून आपण अधिक संघटित, उत्पादक आणि आनंदी जीवन जगू शकतो. सूर्यास्तापासून रात्रीपर्यंत, भरती- ओहोटी, चार ऋतू सर्व काही वेळेवर अवलंबून असते. आपल्या आजूबाजूला घडणाऱ्या घटनांचा इतिहास आपल्याला कळतो आणि या घटनांचे दस्तऐवजीकरण करण्यात आपल्याला मदत होते. विशिष्ट घटनेची वेळ ठरवण्यासाठी इतिहासकार वेळेवर अवलंबून असतात. पुरातन वास्तू आणि कलाकृतींचे वय ठरवण्यासाठी वेळ देखील महत्त्वाचा आहे. जितका वेळ आणि वेळ अप्रचलित असेल तितका तो अधिक मौल्यवान आणि अधिक महाग आहे. आपल्याला उपासनेची कृत्ये माहीत आहेत, विशेषतः प्रार्थना, जी देवावर विश्वास ठेवणाऱ्या साधकांसाठी महत्वाची समजली जाते, ती विलंब न करता ठरलेल्या वेळी केली जाते. त्याचप्रमाणे, सर्व उपासनेचा काळाशी जवळचा संबंध असल्याचे आपल्याला आढळते. ह्याचाच अर्थ, प्रत्येक व्यक्तीला वेळेचे भान राखणे आवश्यक असते. अनेकदा असे दिसून येते कि, काळ आपल्याला सांगून येत नाही आणि वेळा आपल्याला पाळता येत नाहीत.



आधुनिक केसरी




प्रा.ज्ञानेश्वर कुलकर्णी (वतनी)
संपर्क क्र. ९४०३०२९१७८

## नित्य स्मरावी पंढरी |

ऐसा भाव जपा मनी | मुखी वसे संतवाणी ||१||
शुद्ध कर्म ऐसे करी | जेणे सुखावेल हरी ||२||
रात्रंदिन लागे ध्यास | व्हावे ज्ञानियांचा दास ||३||
लागता विठुचा लळा | फुले सावताचा मळा ||४||
ज्ञाना तुका संत सारे | जीवीचे सगे सोयरे ||५||
घडावी मानस वारी | नित्य स्मरावी पंढरी ||६||

## घराघरात स्वर्वेद, मनामनांत स्वर्वेद, जनमनांत स्वर्वेद !

मन इन्द्रिय अधिकार में,
सेवक सम जब होय ।
अज्ञा में कारज करें, जिवन्मुक्ति पद सोय
।।६७।।(स्वर्वेद पंचम मण्डल एकादश अध्याय) ०५/११/६७
मूळ भाष्याचा मराठी अनुवाद :
जेव्हा मन, इंद्रिये अधिकारात राहून सेवकाप्रमाणे आपल्या आज्ञेत राहून कार्य करतात तेव्हा ती जीवन्मुक्त अवस्था असते.




स्वर्वेद रचनाकार अनन्त श्री सद्गुरू सदाफल देवजी महाराज

संदर्भ : हा ग्रंथ तुम्हाला हवा असल्यास वॉट्सअॅप करा ८५५४८८३१६६.

# प्रपंचातले सुख-दु:ख हे केवळ जाणिवेत आहे

आधुनिक केसरी

प्रापंचिकाच्या मनात नेहमी एक शंका येते की, खोटे करूनसुद्धा जर सुखी होता येते तर तसे करायला काय हरकत आहे ? सन्मार्गाने गेला तरी माणूस दुःखी का होतो, अशीही शंका आपल्याला येते. मी देवाला भिऊन वागलो, का, तर प्रपंच सुखाचा व्हावा म्हणून. देवाची एवढी खटपट करूनही जर सुखी होता येत नाही तर काय उपयोग ? किती विचित्र आहे पाहा, खेळातले घर बांधायला आपण गवंडी बोलावण्यासारखा हा प्रकार आहे ! प्रपंचात दक्षता ठेवणे जरूर आहे; ते जर आपण केले नाही तर देवाने काय करावे ? भगवंताचा 'साधन' म्हणून आपण उपयोग करतो, आणि शेवटी साधनालाच दोष देतो, साध्य बाजूलाच राहते. भगवंत विषय देईल, पण त्याबरोबर त्याचे दुःखही देईल. एकजण मारुतिरायाला सांगून चोरी करीत असतो. तो एकदा पकडला गेला आणि त्याला शिक्षाही झाली; तेव्हा तीही मारुतीच्या संमतीनेच झाली असे नाही का ? 'मी कोण' हे जोवर आपण ओळखत नाही तोवर, वैभवाच्या शिखरावर जरी गेलो तरी आपल्याला



समाधान मिळणार नाही. ज्याच्यापासून प्रपंच झाला, त्याला ओळखता आले पाहिजे. देहच सत्य नाही तर त्यावर उभारलेली इमारत कुठून सत्य असणार ? ठिगळे लावून आपण आपला प्रपंच करतो; मग त्यात कमतरता आल्याशिवाय नाही राहात ! कोळसा उगाळून पांढरा रंग मिळेल हे म्हणणे जसे वेडेपणाचे आहे, तसे प्रपंचात सुख मिळवीन हे म्हणणे आहे. सुखदुःख हे जाणिवेत आहे. आपल्याला मिळायचे तेवढेच मिळते, पण आपले हवे-नकोपण, म्हणजे आपली वासना, गेली की सुखदुःख राहात नाही. वासना मारायला, भगवंताचे अधिष्ठान हाच एक उपाय आहे. वासना ही लाडावलेल्या कुत्र्याप्रमाणे आहे, तिला नुसते हड्हड् करून ती बाजूला जात नाही. पण तेही बरोबरच आहे, कारण आपणच तिला लाडावून ठेवले आहे, म्हणून भगवंताच्या पूजेच्या वेळीसुद्धा ती देवघरात येते. शिवाय, वाईट वासनेमध्ये चांगल्या वासनेला मारण्याचे बळ आहे, कारण आपण स्वतः वाईट वासनेच्या बाजूचेच आहोत ! वासना ही कोणत्याही उपायांनी तृप्त होण्यासारखी नसून, आपण जर भगवंताजवळ 'वास' ठेवला तरच ती नष्ट होते. 'मी कर्ता नसून परमात्मा कर्ता आहे' अशी भावना झाल्याशिवाय मन भगवंताला अर्पण होणार नाही; ते अर्पण झाल्याशिवाय फळाची अपेक्षा सुटणार नाही; आणि फळाची अपेक्षा सुटल्याशिवाय जीवाला शांती मिळणार नाही.

**८७. वासना म्हणजे देवाच्या विरूद्ध असलेली आपली इच्छा.**

## गुणरूपनिरूपण

आधुनिक केसरी

सांगायचा मुद्दा हा आहे की हे जग पंचमहाभूतांचे बनलेले आहे. तर आता २५ व्या ओवी पासून हे जग कसे निर्माण झाले याचा अभ्यास करणार आहोत. विश्व निर्मितीपरब्रम्हापासून मूळमाया झाली. मूळमाये पासुन गुणमाया झाली. गुणमायेपासून सत्व,रज,तम या तीन गुणांचा जन्म झाला. गुणमायेपासून पाच भूते जन्माला आली. नंतर ती वेगवेगळी होऊन दृष्य रूपाला आली.
खरंतर पाच भूते आणि तीन गुण मिळून *गुण मायाजन्माला आली. म्हणून आकाश गुणापासून झाले असे कधीच घडत नाही. शब्दाला कशाचे तरी अधिष्ठान हवे यासाठी आकाशाची कल्पना केली आहे.



सौ. उज्ज्वला धर्माधिकारी
संपर्क क्र. 7588235646

## निरूपण

आधुनिक केसरी

नाना वनचरें अपार । या नांव आदिभूतिक ॥ ११ ॥
अश्व वृषभ आणी खर । स्वान शूकर जंबुक मार्जर ।
ऐसीं बहुविध क्रूर । या नांव आदिभूतिक ॥ १२ ॥
ऐसीं कर्कशें भयानकें । बहुविध दुःखदायकें ।
दुःखें दारुणें अनेकें । या नांव आदिभूतिक ॥ १३ ॥
भिंती माळवंदे पडती । कडे भुयेरीं कोंसळती ।

आधुनिक केसरी
विश्वव्यापी मराठी दैनिक
शनिवार, १३ एप्रिल २०२४
adhunikkesari.com

# बीड जिल्ह्यातील ओबीसी जनतेने ओबीसी बहुजन पार्टीच्या उमेदवाराच्या पाठीशी खंबीरपणे उभे राहवे : प्रा.टी.पी.मुंडे

## यशवंत अण्णा गायके हे ओबीसी बहुजन पार्टीचे बीड लोकसभेचे उमेदवार म्हणून जाहीर!

आधुनिक केसरी न्यूज

**बीड :** ओबीसींच्या न्याय हक्कासाठी आरक्षणासाठी ओबीसी बहुजन पार्टीची स्थापना झाली असून बीड येथून यशवंत अण्णा गायके यांची बीड लोकसभेची उमेदवारी जाहीर केली ओबीसी बहुजन पार्टीचे राष्ट्रीय उपाध्यक्ष प्रा.टी.पी. मुंडे सर यांनी बीड येथील नीलकमल हॉटेल येथे घेण्यात आलेल्या पत्रकार परिषदेत उमेदवारी जाहीर केली. ओबीसी, व्हिजे एन टी, एससी एसटी विमुक्तभटके जाती जमाती बारा बलुतेदार, आलुतेदार यांनी ओबीसी बहुजन पार्टीच्या उमेदवाराच्या पाठीशी खंबीरपणे उभे राहून लोकसभेत पाठवावे. उठ ओबीसी जागा हो यशवंत अण्णा यांच्या विजयाचा धागा हो असे आवाहन बीड जिल्ह्यातील जनतेला त्यांनी केले. ओबीसी बहुजन पार्टीने राज्यात 14 जागावर उमेदवार दिले असून सात जागांवर जाहीर पाठिंबा दिला आहे. बीडमध्ये यशवंत अण्णा यांच्या उमेदवारीची घोषणा केली. त्यांनी पत्रकारांच्या विविध प्रश्नांना दिलखुलासपणे उत्तरे दिली. बीड जिल्ह्यात मराठा समाजाच्या काही लोकांनी जाळपोळ केली या जाळपोळीमध्ये ओबीसी समाजाचे नेत्यांना टार्गेट करण्यात आले. आमदारांची घरे जाळण्यात आली. हॉटेल, छोटी दुकाने,टपऱ्या जाळण्यात आल्या. या जाळपोळीची पाहणी आमचे नेते माननीय छगनरावजी भुजबळ साहेब, ओबीसी बहुजन पार्टीचे अध्यक्ष प्रकाश अण्णा शेंडगे, उपाध्यक्ष प्रा.टी.पी.मुंडे सर यांनी केल्यानंतर अंबड मधून ओबीसीचा एल्गार पुकारला आणि ओबीसीच्या आरक्षणासाठी लढा उभारला. ओबीसी संकटात असताना, ओबीसीची 22 मेळावे झाले तरी जिल्ह्यातील ओबीसी नेते कुठे होते असा सवाल त्यांनी केला. बीड जिल्हा हा ऊसतोड




कामगारांचा जिल्हा म्हणून ओळख आहे. बीड जिल्ह्याच्या ऊसतोड कामगाराचा आणि ओबीसीचा गेल्या पंचवीस वर्षांमध्ये कसल्याही प्रकारचा विकास झाला नाही त्यामुळे बीड जिल्ह्याची जनता ही ओबीसीच्या उमेदवारांच्या पाठीमागे खंबीरपणे उभे राहील असा विश्वास त्यांनी व्यक्त केला. एल्गार मेळाव्या मधून लोकांची मागणी होती की ओबीसीचा स्वतंत्र पक्ष असला पाहिजे आम्ही कोणाला मतदान करावे त्यामुळे या मागणीचा विचार करून ओबीसी बहुजन पार्टीची स्थापना करण्यात आली आहे. मराठा समाज जाणून बुजून ओबीसीच्या आरक्षणामध्ये घुसू पाहत आहे. बीड जिल्ह्यातील सामान्य जनतेचे प्रश्न सोडवण्यासाठी आमचा उमेदवार कटीबद्ध आहे त्यासाठी ओबीसीने एकत्र येण्याची गरज आहे त्यामुळे ओबीसीच्या उमेदवाराला साथ देऊन लोकसभेत पाठवा असे आवाहन त्यांनी जिल्ह्यातील जनतेला केले आहे. यावेळी ओबीसी बहुजन पार्टीचे मराठवाडा अध्यक्ष भीमराव मुंडे, जिल्हाध्यक्ष विनायकराव गडदे, ओबीसी बहुजन पार्टीचे बीड जिल्ह्याचे उमेदवार यशवंत अण्णा गायके, परळी तालुका अध्यक्ष सूर्यकांत मुंडे, उपाध्यक्ष माणिकराव सलगर , डॉ.भगवानराव सरवदे आदी उपस्थित होते.

# मोदीजींच्या विकास गाडीला काँग्रेसचे पंक्चर चाक लावू नका

## सुधीर मुनगंटीवार यांचे चंद्रपूरच्या जनतेला जाहीर आवाहन

आधुनिक केसरी न्यूज

**चंद्रपूर :** देशाचे कर्तृत्ववान प्रधानमंत्री नरेंद्र मोदीजी यांच्या नेतृत्वात संपूर्ण भारत देशाची प्रगती होत आहे. देश विकासाच्या दृष्टीने वाटचाल करीत असताना काँग्रेसचे पंक्चर चाक मोदींच्या विकास गाडीला लावू नका, चंद्रपूर लोकसभा क्षेत्रात काँग्रेसचे पंक्चर झालेले चाक आता पाच वर्ष दुरुस्त होऊच शकत नाही, अशी जोरदार टीका करीत चंद्रपूर-आर्णी-वणी लोकसभा मतदारसंघाचे भाजपा, शिवसेना, राष्ट्रवादी काँग्रेस मित्र पक्ष महायुतीचे अधिकृत उमेदवार सुधीर मुनगंटीवार यांनी काँग्रेस पक्षावर निशाणा साधला आहे. चंद्रपूर शहरातील पठाणपुरा बाबू पेठ आणि बंगाली कॅम्प येथे लोकसभा निवडणूक प्रचारार्थ नुकतीच जाहीर सभा पार पडली.




या सभेला ते मार्गदर्शन करताना बोलत होते पुढे बोलताना ते म्हणाले की, लोकशाहीचा सर्वात मोठा उत्सव हा लोकसभा निवडणूक असतो हा उत्सव आता जवळ आलेला आहे. या उत्सवात मागील वर्षी केलेली चूक यावर्षी होऊ नये याची प्रत्येकांनी काळजी घेतली पाहिजे. मागील साडेचार वर्षात या चंद्रपूर लोकसभा क्षेत्राचा विकास खुंटला आहे त्यामुळे आता आपण सर्वांनी विकासासाठी मतदान करा असे आवाहन मी करतो. चंद्रपूरकरांनी जेव्हा जेव्हा मला विकास काम करण्याची संधी दिली तेव्हा तेव्हा मी तुमच्या सर्वांच्या विश्वासास पात्र ठरलो आहे, हे तुम्हाला माझ्या मतदार संघात केलेल्या विकासकामांवरून दिसून येते. चंद्रपूर लोकसभा क्षेत्रातील कुठलेही गोरगरीब कुटुंबातील मुलींच्या शिक्षणात गरिबी आडवी येणार नाही. यासाठी ६०० कोटी रुपये खर्च करून आपण एसएनडीटी युनिव्हर्सिटीची निर्मिती करीत आहोत. त्यामध्ये ६२ नवीन कोर्सेस सुरू होतील त्याचा या क्षेत्रातील गरीब कुटुंबातील मुलींना त्याचा फायदा होईल याचा मला विश्वास आहे. डॉक्टरकडे गेल्यावर आपण त्याची जात विचारत नाही. तो माझ्या जातीचा असेल तर उपचार घेईल अन्यथा उपचार घेणार असे आपण म्हणत नाही. गवंडी कामगार हा माझ्या जातीचा असेल तरच मी घर बांधणार अन्यथा घर बांधणार नाही असा आपण विचार करीत नाही. कटिंग दाढी करायची असेल तर माझ्या जातीच्याच दुकानात जाऊन कटिंग दाढी करेल, याचा विचार आपण करत नाही. मग आपण निवडणुक आल्यावरच जात का बघतो? असा प्रश्न ना. मुनगंटीवार यांनी विचारला. निवडणुकांमध्ये जातीपातीच्या राजकारणाला बगल दिली पाहिजे. जे उमेदवार मतदार संघाचा विकास करू शकत नाही, ते जातीपातीवर मत मागतात. मी कधी राजकारणात जात बघितली नाही, मी केलेल्या विकास कामांवर आजपर्यंत निवडून आलो आहे. त्यामुळे आपण सुज्ञ मतदारांनी जात न बघता जो विकास कामे करतोय अशाच उमेदवाराला तुम्ही संधी दिली पाहिजे, असे आवाहन ना. मुनगंटीवार यांनी केले. यावेळी ना. मुनगंटीवार यांनी केलेल्या विकास कामांच्या यादीचा पाढा जाहीर सभेत वाचून दाखविला. जाहीर सभेपूर्वी लक्ष्मीनारायण देवस्थान तसेच श्री व्यंकटेश स्वामी समर्थ मंदिर येथे भेट देऊन त्यांनी सहपरिवार स्वामी समर्थांचा आशीर्वाद घेतला. यासोबतच सकाळी गांधी चौक पासून पदयात्रेला ना. मुनगंटीवार यांनी सुरूवात केली. गोलबाजार, टिळक मैदान, भाजी मार्केट, सराफा लाईन पदयात्रा ना. मुनगंटीवार यांनी काढली. यावेळी केळी विकणारे, शेवय्या विकणारे, फुल विक्रेते, किराणा दुकानदार व्यावसायिकांनी सुधीर मुनगंटीवार यांना आर्शीवाद दिला. यासोबतच चंद्रपूरातील व्यावसायिकांकडून ना. मुनगंटीवार यांचा सत्कार करण्यात आला. या पदयात्रेमध्ये चंद्रपूरकर मोठया संख्यने सुधीरभाऊ आप आगे बढो हम तुम्हारे साथ है हा नारा देत सहभागी झाले. पठाणपुरा बाबूपेठ आणि बंगाली कॅम्प परिसरात झालेल्या जाहीर सभेला भाजपा महानगरचे जिल्हाध्यक्ष राहुल पावडे, ज्येष्ठ नेते प्रमोद कडू, शिवसेना जिल्हाप्रमुख नितीन मते, राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे बंडू हजारे, राजू कक्कड, सुरज पेदूलवार, किरण बुटले, प्रज्वलंत कडू, रामपाल सिंह, सविता कांबळे, बाजार मंडळ अध्यक्ष सचिन कोतपल्लीवार, अजय सरकार, दिनकर सोमलकर, नगरसेवक संगीता खांडेकर, विशाल निंबाळकर, चंद्रकला सोयाम, तुषार सोम, राजीव गोलीवार, भरत गुप्ता, प्रतिभा ठाकूर, रवी चहारे, रमेश भुते, राजेंद्र खांडेकर, धनंजय हुड, श्याम बोबडे, सुभाष आदमने, अजय सरकार, डॉ. दीपक भट्टाचार्य, राजश्री जुमडे, कल्पना बगुलकर, ज्योती गेडाम, प्रदिप किरमे, शाम कनकम, दीपक कामनवार, मनीषा चौधरी, कविता सोमनाथ जाधव, चंद्रकला जाधव, सविता कांबळे, तुषार सोम यांच्यासह मित्रपक्ष महायुतीचे कार्यकर्ते व पदाधिकारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# निवडणुकीसाठी मतदान यंत्र सज्ज

आधुनिक केसरी न्यूज

**चंद्रपूर :** लोकसभा सार्वत्रिक निवडणुकीच्या पहिल्या टप्प्याच्या मतदानासाठी केवळ एक आठवडा शिल्लक आहे. त्यामुळे संपूर्ण जिल्हा प्रशासन अहोरात्र राबत आहे. याच अनुषंगाने मतदानासाठी ईव्हीएम, व्हीव्हीपॅट यंत्र तयार करण्याची प्रक्रिया सर्व विधानसभा मतदारसंघात सुरू आहे. चंद्रपूर मतदारसंघातील 383 मतदान केंद्रासाठी मशीन तयार करण्याची प्रक्रिया तहसील कार्यालय येथे जिल्हाधिकारी विनय गौडा जी.सी. यांच्या उपस्थितीत पार पडली. दोन दिवसांत संपूर्ण मशीन सज्ज करून चंद्रपूर येथे 19 हजार मतांचे मॉक पोलसुध्दा करण्यात आले. 13 - चंद्रपूर लोकसभा मतदारसंघासाठी पहिल्या टप्प्यात म्हणजे 19 एप्रिल 2024 रोजी मतदान होणार आहे.

या अनुषंगाने चंद्रपूर विधानसभा मतदारसंघात मशीन तयार करण्याची प्रक्रिया तहसील कार्यालयात 11 आणि 12 एप्रिल रोजी घेण्यात आली. चंद्रपूर विधानसभा मतदारसंघात एकूण 383 मतदान केंद्र आहेत. यासाठी 478 बॅलेट युनिट, 478 कंट्रोल युनीट आणि 517 व्हीव्हीपॅट उपलब्ध आहेत. मशीन तयार करण्याच्या प्रक्रियेसाठी तहसील कार्यालय, चंद्रपूर येथे एकूण 30 टेबल लावण्यात आले होते. प्रत्येक टेबलवर 3 कर्मचारी याप्रमाणे एकूण 90 कर्मचा-यांमार्फत ईव्हीएम, व्हीव्हीपॅटसह मशीन सज्ज करण्यात आली. चंद्रपूर विधानसभा मतदारसंघातील 383 मतदान केंद्रासाठी असलेल्या ईव्हीएमपैकी 5 टक्के म्हणजे 19 मशीन मॉक पोलकरीता रॅन्डम पध्दतीने निवडण्यात आले. प्रत्येक मशीनवर 1000 याप्रमाणे दोन दिवसांत 19 मशीनवर 19 हजार मॉक पोल घेण्यात आले.

**अशी असते प्रक्रिया :** ईव्हीएम, व्हीव्हीपॅट यंत्र तयार करण्याची प्रक्रिया ही उमेदवार किंवा त्यांच्या प्रतिनिधींसमोर केली जाते. यात मतपत्रिका बॅलेट युनीटला लावून सील करणे, प्रत्येक उमेदवाराला मतदान करून बघणे (मॉक पोल), मतदान झाल्यानंतर व्हीव्हीपॅटच्या चिठ्ठ्या आणि ईव्हीएम चा डाटा जुळवून बघणे. त्यानंतर कंट्रोल युनीट, बॅलेट युनीट आणि व्हीव्हीपॅट सील करून स्ट्राँग रुममध्ये ठेवण्यात येते. प्रत्यक्ष मतदानाच्या एक दिवस अगोदर मतदान पथकाला मशीनचे वाटप केले जाते.

**जिल्हाधिकाऱ्यांच्या समक्ष प्रक्रिया :** जिल्हाधिकारी विनय गौडा जी.सी. यांनी स्वतः समोर मशीन तयार करण्याची प्रकिया करून घेतली. मशीनला व्यवस्थित सिलींग करणे जेणेकरून मतदानाच्या दिवशी कोणतीही अडचण निर्माण होणार नाही. तसेच मॉक पोल होतांना व्हीव्हीपॅट काम करते की नाही, याची काटेकोरपणे तपासणी करावी, अशा सूचना जिल्हाधिकाऱ्यांनी दिल्या. यावेळी सहायक जिल्हाधिकारी रंजित यादव, सहायक निवडणूक अधिकारी तथा उपविभागीय अधिकारी संजय पवार, तहसीलदार विजय पवार आदी उपस्थित होते.

# नकली राष्ट्रवादी व नकली शिवसेना ही भाजपसोबत : महेश तपासे

आधुनिक केसरी न्यूज

**मुंबई :** आमच्या राष्ट्रवादीला नकली राष्ट्रवादी संबोधणारे अमित शाह कोण अशी संतप्त प्रतिक्रिया राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे मुख्य प्रवक्ते महेश तपासे यांनी दिली.

आमच्यातल्या काही नकली नेत्यांना भारतीय जनता पार्टीने या आधीच स्वतःच्या सरकारमध्ये समाविष्ट करून घेतले आहे व त्यामुळे आता राष्ट्रवादी काँग्रेस पक्षावर आरोप करण्याचे कुठलेही कारण नसल्यामुळे अमित शहा यांनी पवार साहेबांचे कर्तुत्व काय असा अतिशय हास्यस्पद प्रश्न निवडणूक सभेदरम्यान विचारला अशी टीका तपासे यांनी गृहमंत्र्यांवर केली.

महाविकास आघाडीचा मोठा धसका भारतीय जनता पार्टीने घेतला असून महायुतीच्या जागा वाटपाबाबत नकली शिवसेना व नकली राष्ट्रवादीच्या मध्ये प्रचंड नाराजगी निर्माण झाली आहे. ह्या नाराजगी कडे जनतेचे लक्ष जाऊ नये म्हणून शहा साहेबांनी पवारांचे कर्तुत्व काय हा प्रश्न विचारला असेही महेश तपासे म्हणाले. महाराष्ट्रात आल्यावर पवारांवर टीका केली नाही तर मथळे तयार होत नाही आणि म्हणूनच जुमला पार्टीच्या नेत्यांना पवारांवर काहीतरी बोलावं लागतं परंतु महाराष्ट्राच्या बारा कोटी जनतेला पवार साहेबांचं राज्यासाठी काय योगदान आहे याची पूर्ण कल्पना आहे असा टोला महेश तपासे यांनी लगावला.

## रुग्णालयांची कानउघडणी

आधुनिक केसरी

रुग्णालयातील राखीव खाटांच्या मुद्द्यावरून सर्वोच्च न्यायालयाने खासगी रुग्णालयांची चांगलीच कानउघडणी केली आहे. खासगी रुग्णालये सरकारकारी अनुदान घेऊन गरीब रुग्णांसाठी खाटा राखीव ठेवण्याचे आश्वासन देतात. मात्र, हे आश्वासन कधीच पूर्ण करत नाहीत, असे न्यायालयाने म्हटले आहे. न्यायमूर्ती सुधांशू धुलिया आणि न्यायमूर्ती प्रसन्ना बी. वराळे यांच्या खंडपीठासमोर नेत्ररोगांवरील उपचारांसाठी देशभरात एकसमान दर निश्चित करण्याच्या निर्णयाला आव्हान देणाऱ्या याचिकेवर सुनावणी पार पडली. यावेळी न्यायालयाने ही टीप्पणी केली. देशभरातील काही खासगी रुग्णालये सरकारी अनुदानावर जमीन घेतात. त्यावर रुग्णालये बांधतात, तसेच या रुग्णालयात २५ टक्के खाटा गरीब जनतेसाठी राखीव ठेवण्याचे आश्वासन देतात. मात्र, हे आश्वासन कधीच पूर्ण केलं जात नाही. हे अनेकदा आम्ही बघितलं आहे, असे निरीक्षण सर्वोच्च न्यायालयाने नोंदवले. सरकारने संपूर्ण देशभरात नेत्ररोगाच्या उपचारासाठी एकसमान दर निश्चित करण्याचा निर्णय घेतला आहे. मात्र, या निर्णयाविरोधात ऑल इंडिया ऑप्थॅल्मोलॉजिकल सोसायटीच्यावतीने सर्वोच्च न्यायालयात याचिका दाखल करण्यात आली आहे. यात तज्ज्ञांचे दर आणि सामान्य डॉक्टरांचे दर सारखे असू शकत नाहीत, असे सांगण्यात आले आहे. दरम्यान, बुधवारी सर्वोच्च न्यायालयात झालेल्या सुनावणीदरम्यान ऑप्थॅल्मोलॉजिकल सोसायटीच्यावतीने वरिष्ठ वकील मुकुल रोहतगी आणि बी. विजयालक्ष्मी यांनी बाजू मांडली. यावेळी सरकारचा हा निर्णय योग्य नाही, असे त्यांनी न्यायालयाला सांगितले. न्यायालयाने याप्रकरणी केंद्र सरकारला नोटीस जारी करून त्यांची बाजू मांडण्याचे निर्देश दिले आहेत.



राम कुलकर्णी,
संपर्क 9422742577

## दीडशहाण्यांमुळेच महाराष्ट्राचे राजकारण बिघडले ?

आधुनिक केसरी

**चैत्र शुद्ध पाडव्याच्या शुभ मुहुर्तावर देखील जो राजकिय नेता शुभ बोलत नाही, विरोधकांना दिड शहाण्याची भुमिका देवुन जातो. त्यावेळी मात्र सामान्य जनतेला अशा शुभ दिवसाला देखील राजकिय लोभापोटी शिव्या देवुन जाणारा कोण असेल?तर तो दिड शहाणाच म्हणावा लागेल. साडे तीन शहाणे एकत्र आले म्हणुनच महाराष्ट्राला स्थिर सरकार, सामान्य जनतेच्या हिताचं रक्षण करणारं सरकार, हिंदुत्वाची गुढी उभारणारं सरकार मिळालं. मात्र एका दिड शहाण्याने मागच्या पाच वर्षात मातोश्री ते सिल्वर बंगला समुद्रीमार्गाने अंतर पार करून केलेल्या काड्या, लावलेली आग कितीही बंब आणले तरी विझता विझेना.**

स्व.बाळासाहेब ठाकरेंची शिवसेना ज्यांनी मोडुन टाकली, मुळ राष्ट्रवादी पक्षात ज्यांच्या कुटाण्यामुळे उलथापालथ झाली, एवढेच नाही तर राज्यातल्या काँग्रेस पक्षाला न विचारता ज्यांनी सोनिया दरबार दिल्लीत जावुन गाठला. त्याच खा.संजय राऊतामुळे राजकिय महाभारत महाराष्ट्रात घडले, राजकारणाचा वैचारिक स्तर घसरला, एवढेच नव्हे तर मातोश्रीचा चेहरा कलंकित झाला. मग तुम्हीच ठरवा, साडे तीन शहाणे चांगले का? एक दिड शहाणा चांगला?

भारतीय हिंदु संस्कृतीत गुढीपाडवा मराठी वर्षे म्हणुन जसा ओळखल्या जातो, तसंच शुभ दिवस म्हणुन याकडे पाहिल्या जातं. कारण साडे तीन मुहुर्तापैकी दिवस साजरा केला जातो. संकल्पाने म्हटलं तर एकमेकाविषयी असलेला दुराग्रह, द्वेष या साऱ्या गोष्टी गुंडाळुन आपलेपणाचं नातं दृढ करणारा दिवस ज्यातुन एकात्मता, स्नेहभावनेची गुढी उभारल्या जाते. शत्रुला ऱ्हदयातुन जवळ करणारा दिवस असं देखील म्हणता येईल. कारण संकल्प असा करण्यासाठी शुभ मुहुर्त आपलं शरीर विकारमुक्त होवुन शुद्ध विचार, अंतःकरण त्यातुन समाज सेवेचा दृढभाव पण नतद्रष्ट माणसं ज्यांना अशा दिवसाची किंमतच नसते. जे की, नेहमीच दुसऱ्याच्या वाईटावर बसलेले असतात. ज्याची प्रवृत्ती राक्षसी असते, जो पाडव्याला सिमगा साजरा करतो, त्यांच्या बाबतीत बोलावं तरी काय? मांगल्याची गुढी उभारत असताना रोजच्याप्रमाणे शिव उबाठाचे नेते संजय राऊत टिव्हीवर धडकले. अर्थात शुभ दिनी त्यांच्याकडून काही चांगलं मुखातुन बाहेर पडेल या अपेक्षा जनतेलाच राहिल्या नाहीत. त्यांचा चेहरा दिसला टिव्हीवर की ऐंशी टक्के लोक बटण स्विच ऑफ करतात हे नक्कीच. ते म्हणाले, महाराष्ट्रात साडे तीन शहाणे आहेत? त्यांच्या बोलण्याचा रोख कुणाकडे होता? हे न समजण्याएवढी जनता दुधखुळी नाही. तीनपैकी अर्धा शहाणा कदाचित आज उद्या सांगतील. पण एक लक्षात घ्या, राज्यातले तीन मोठे नेते मुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री देवेंद्रजी फडणवीस, उपमुख्यमंत्री अजितदादा पवार, हे खरंच तत्वज्ञानी, दुरदृष्टी शहाणे होते म्हणूनच महाराष्ट्रात 2019 ला एका दिड शहाण्याच्या पुढाकाराने स्थापन झालेली महाविकास आघाडीची सत्ता उलथवुन टाकली. आठवा तो काळ, अडीच वर्षे मुख्यमंत्री उद्धवजी ठाकरे वर्षाबाहेर पडलेच नाहीत. सत्तेचा गैरवापर विचाराल तर नवनित राणासारख्या खासदार महिलेला जेलात सडवलं. कंगना राणावत चित्रपट अभिनेत्रीचं निवास जेसीबी लावुन पाडलं. केतकी चितळेसारख्या तरूणीचं व्यक्तीस्वातंत्र्य हिरावुन दिलेला त्रास लोकांनी डोळ्यांनी पाहिला. विकासाचा दावा महाविकास आघाडी नेते करूच शकत नाहीत. त्याचं कारण ज्यांचा गृहमंत्री शंभर कोटीच्या आरोपात जेलमध्ये जातो. त्यांनी भ्रष्ट मार्गाने अडीच वर्षात कारभार केला. याला दुसरा दाखला देण्याची गरजच काय? अशा अनेक घटना त्यांच्या काळात. मग पत्रकार अर्णव गोस्वामी असतील किंवा राहुल कुलकर्णी असेल? एवढेच नव्हे तर केंद्रिय मंत्री नारायण राणे यांना केवळ राजकिय सुडापोटी अटक करून रात्रभर ठाण्यात बसवलं. या साऱ्या घटनाक्रमामागे हेच दिड शहाणे होते हे विचारायला कुणा भविष्यवाल्याकडे जाण्याची गरज नाही. मागे वळुन पाहताना साडेतीन शहाणे कसे परवडतात? पण एक दिड शहाणा कशा प्रकारे व्यवस्थेची वाट लावुन जातो?हे तितकंच खरं. 2019 ला विधानसभा निवडणुकीत राज्यातील जनतेने तत्कालीन शिवसेना-भाजप महायुतीला कारभार करण्याचा जनादेश दिला होता. त्या अगोदर 2019 ला लोकसभा निवडणुकीत केवळ पंतपधान नरेंद्र मोदी यांच्यामुळे मुळ शिवसेनेचे सतरा-अठरा खासदार निवडुन आलेले होते. विधानसभा निवडणुकीत राजकिय लोभापोटी नव्हे तर मुख्यमंत्री पदासाठी तत्कालीन काळात महायुती तोडली. महाविकास आघाडी स्थापन केली. पंचेवीस वर्षाची अभेद भाजप-शिवसेना युती तोडून ज्यांच्यामुळे हिंदुत्वाचा विचार समुद्रात फेकुन दिला, ज्यांनी प्रवृत्त केलं, तेच दिड शहाणे आज होत असलेल्या साऱ्या मुळ शिवसेनेच्या वाताहतीला जबाबदार नाहीत का? एक गोष्ट लक्षात घेतली पाहिजे कुठेही दिड शहाणा असला की त्याची भुमिका



व्यक्ती स्वार्थाने 100 टक्के बरबटीत झालेली असते. पुरातन काळात देखील महाभारतात शकुनी मामा होता. रामायणात कैकयी होती. साधुसंतांना देखील त्रास देणारे असे दिड शहाणे होते. कदाचित दिड शहाणे नसते तर मग रामायण, महाभारत घडलेसुद्धा नसतं. एवढेच नव्हे तर देशाला स्वातंत्र्य मिळाल्यानंतर तत्कालीन काळात अशाच दिड शहाण्या लोकांच्या भुमिकेमुळे आपल्या देशाचे तुकडे झाले.

ज्याला जबाबदार आजची काँग्रेस तत्कालीन काळात निश्चितच होती असं म्हणायला वाव मिळतो. वर्तमान महाराष्ट्राच्या राजकारणात शिवसेनेत घडलेले महाभारत ज्याची जबाबदारी दिडशहाण्या माणसाकडे जाते. जो माणुस पाडव्यासारख्या शुभ मुहुर्तावर देखील शुभ बोलत नाही. ज्यांना डॉ.बाबासाहेब आंबेडकरांनी स्थापन केलेले संविधान देखील कळत नाही. काय तर म्हणे? देशात लोकशाहीचा उत्सव सुरू आहे. त्यात पंतप्रधान पद राहिलंच नाही. अरे बाबा, सत्ताधारी संविधान पदावर असलेली व्यक्ती लोकशाहीच्या आदर्श निवडणुक मार्गाने पुढे जात असली तरी आचारसंहिता काळात काळजीवाहु म्हणुन पंतप्रधानच काम करू शकतात.मग ते पंतप्रधान नाहीत असं म्हणणं याचाच अर्थ अशा दिडशहाण्या लोकांना डॉ.बाबासाहेब आंबेडकरांनी स्थापन केलेले संविधान मान्य नाही निघु शकतो. खरं तर अगोदर नागरिकशास्त्र शिकण्याची त्यांना गरज वाटते तर मग काळजीवाहु सरकार आणि त्यांना संविधानाने दिलेले अधिकार अभ्यास कळुन चुकेल. आजवर लोकसभेच्या निवडणुका जेवढ्या झाल्या त्या काळात सत्ताधारी पंतप्रधान निवडणुका लागल्या तरी काळजीवाहु ही जबाबदारी त्यांच्याकडे असते. पण एक शहाणा आणि अर्धा शहाणा एकुण दिड शहाणे असलेले उबाठा गटाचे मुख्य प्रवक्ते श्रीमान संजय राऊतांना हे सारं कसं कळत नाही? म्हणून स्वभावाप्रमाणे उचलली जीभ लावली टाळाला, बोलत राहतात, कधी बोलावं?, काय बोलावं? कुणावर कशाचा आरोप करावा? कुणामध्ये काय बोलण्याचे परिणाम होतात? हे ज्यांना कळत नाही तोच खरा दिड शहाणा. सहकारी पक्ष असलेल्या काँग्रेसवाल्यावर देखील नौटंकी करू नका असा आरोप लावुन सांगलीत त्यांनी विश्वजीत कदमांनाच आवाहन दिले. तेव्हा वैचारिक दिवाळखोरी किती संपुष्टात येते? त्यालाच दिडशहाणा म्हणतात. आमचे साडे तीन शहाणे निश्चितच एका दृढ संकल्पाने पुढे जाताना याच मराठी चैत्र शुद्ध वर्षात देशाचं नेतृत्व तिसऱ्यांदा पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्याकडे देण्यासाठी महाराष्ट्रातून 48 जागा विजयीभव असं म्हणत जगन्नाथाचा हा रथ दिल्लीकडे घेवुन आगेकुच करताना दिसतात.



गणेश खाडे
संपर्क क्र. 9011634301

## आदर्शच दिशाहीन असतील तर आदर्श पिढी घडेल कशी

आधुनिक केसरी

**आपण ज्यांना आदर्श समजतो तेच दिशा हिन असतील तर आदर्श पिढी घडणार कशी आजकाल आदर्श म्हणजे क्षणात बदलण्याचं ठिकाण झालं आहे. आपला आदर्श कोण आहे आणि तो किती दिवस राहिल हे कोणीही खात्रीने सांगू शकणार नाही.कारण आदर्शाची कल्पना वेळेनुसार बदलतं आहे.आदर्श म्हणजे क्षणिक आवड झाली आहे.आपण ज्यांना आदर्श मानतो त्यांना तरी आचरण करताना भान आहे का कि आपल्याला पाहुण अनेक लोक आचरण करतात मग आपण किती काळजी पुर्वक दक्षता घेऊन जबाबदारी ने वागल पाहिजे. आपण ज्याला आदर्श समजतो तो त्याच आचरण सार्वजनिक पातळीवर अगदी लहान मुलांसारख करत आहे.आपणं कोणासाठी तरी आदर्श आहोत याचा विसर पडतो आहे अशा पद्धतीने सेलेब्रिटी वागतात.**

आपण त्यांना आपला आदर्श समजतो तेच व्यक्तिमत्व जर दिशा हिन असेल तर आपण योग्य ठिकाणी कसे पोहचणार.आदर्श म्हणजे आरसा ज्या मध्ये भेद लपत नाही अथवा लपवता येत नाही. आपला आदर्श हा आरशा सारखा स्वच्छ भेदरहित सर्व गुणसंपन्न,अवगुण विरहित,सत्यनिष्ठ,शांत संयमी,स्थिर, विवेक शील वैचारिक परिपक्व व निर्व्यसनी असेल तर निश्चितच आपलं कल्याण होईल. या मध्ये तीळमात्र शंका नाही पण आपलं आदर्श स्थान निवडताना काही गडबड झाली तर मग त्याचे विपरीत परिणाम देखील आपल्याला मोजावे लागतील.आपल्या जडणघडणीच आदर्शस्थान जर दिशा हिन असेल तर आपण योग्य कसे घडणार हाच मुळात गहण विषय आहे.जीवनात प्रत्येक व्यक्ती आपला आदर्श म्हणून कोणाला तरी पाहुण स्वतःच आयुष्य त्या पद्धतीने घडवित असतो. आपली जडणघडण होत असताना आपल आदर्शस्थान योग्य असेल तर मग आयुष्याच्या शेवटी आपल्याला फार चिंता करण्याची आवश्यकता नाही.पण आपलं गणित फसलं आणि आदर्श चुकला तर मग आपली फजिती झाली म्हणून समजा, आपलं आयुष्य एवढ सर्वसाधारण आहे का कि आपण कोणाताही विचार न करता कोणालाही आदर्श समजावं आपण ज्याला आदर्श समजावं त्यांचं कार्य महती गुण अवगुण आपण जाणतो का या पैकी काय पाहुण आपण आदर्श निवडतो.आपला आदर्श कोण आणि का याच काही तरी मुल्यमापन आपल्याकडं आहे का मला उगाच कोणीतरी सिनेतारक आवडतो कोणी तरी क्रिकेटपटु आवडतो अथवा एखाद्या राजनेता तत्सम या पैकी कोणी ना कोणी तरी आपल्याला उगाच आवडतो आवडीच कारण गुलदस्त्यात असतं. म्हणजे आपली आवड का अथवा आपण आपला आदर्श त्यांना का मानतो याच काहिच गांभिर्य आपल्याला नसतं.आपला आदर्श तंबाखू पासुन सर्व प्रकारच्या मद्याची जाहिरात करतो आणि भाषा तर विचारू नका. मग आपला आदर्श असणारा तारक एवढा उत्कृष्ट असेल तर आपण किती उत्कृष्ट घडणार आपणं ज्यांच अनुकरण करत मार्गक्रमण करतो अथवा ज्यांना आपला तथाकथित मार्गदर्शक समजतो ते व्यक्तिमत्व खरंच आदर्श आहे का ते व्यक्तिमत्व खरच आदर्श असेल तर आपली दिशा योग्य आहे.या मध्ये कुठेही शंका नाही अडचण नाही पण आपणं ज्यांना आदर्श समजतो मानतो तेच दिशाहिन असतील तर आपल्याला कोणती दिशा मिळेल याच चिंतन आपण कधी करतो का आदर्श हा दुरदृष्टी, संयमित,सत्यनिष्ठ, न्यायप्रिय,नितिवान असला पाहिजे.मुळात आदर्श स्थान आपण जे निवडलं अथवा स्वीकारलं तिथेच गडबड आहे.आपण ज्यांना आदर्श समजतो ते जगाच्या सोडा स्वतःच्या नजरेत तरी आदर्श आहेत का याचा विचार आपण कधी तरी केला पाहिजे आणि आपलं आयुष्य गडबड होणार नाही असा आपला आदर्श असला पाहिजे.

हे पत्र संपादक, मालक, मुद्रक व प्रकाशक डॉ. प्रभू व्यंकटराव गोरे* यांनी सोलापूर तरुण भारत मीडिया लि., प्लॉट नं ए -३२, छत्रपती संभाजीनगर इंडस्ट्रीयल को-ऑप., सोसायटी, स्टेशन रोड, छत्रपती संभाजीनगर ४३१ ००५ (महाराष्ट्र) येथे मुद्रित करून प्लॉट नं. २०५, १३ वी योजना, जिजामाता कॉलनी, एन - २, सिडको, जि. छत्रपती संभाजीनगर (महाराष्ट्र) येथून प्रकाशित केले. कार्यकारी संपादक - बाजीराव श्रीराम खांदवे, अहमदनगर कार्यालय - तिसरा मजला, खरेदी विक्री संघाची जुनी इमारत, मार्केट यार्ड, स्टेशन रोड, अहमदनगर ४१४००१, फोन ९८२२१०७६५०. (* पीआरबी कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी यांची आहे. या अंकात प्रसिद्ध झालेल्या प्रत्येक बातमी, लेख व जाहिरातींशी संपादक सहमत असतीलच असे नाही. सर्व वाद छत्रपती संभाजीनगर न्यायालयाच्या कक्षेत) आरएनआय : एमएएचएमएआर/२०२१/८२५६६, ई-मेल : aadhunikkesari@gmail.com, संपर्क : +९१ ९०७५७ १६७३९

Printed at Solapur Tarun Bharat Media Ltd., Plot No. A-32, Chhatrapati Sambhajinagar Industrial Co-op, Society, Station Road, Chhatrapati Sambhajinagar 431005 (Maharashtra) Plot No. 205, 13th Plan, Jijamata Colony, N - 2, CIDCO, Dist. Chhatrapati Sambhajinagar (Maharashtra) and published by editor, owner, printer, and publisher Dr. Prabhu Venkatrao Gore * Executive Editor - Bajirao Shriram Khandave. Ahmednagar office - third floor, kharedi - vikri sangh old building, Market yard Station Road, Ahmednagar 414001. Phone 9822107650.(* According to the PRB Act, it is the responsibility of the editor. The editor does not necessarily agree with every news, article, and advertisement published in this issue. All disputes are within the purview of the Chhatrapati Sambhajinagar court.) RNI : MAHMAR/2021/82566, E-mail: aadhunikkesari@gmail.com, Contact : +91 90757 16739

# व्यवस्था परिवर्तनासाठी जनचर्चा महत्त्वपूर्ण

## आधुनिक केसरी जनचर्चेवरील प्रतिक्रिया

आधुनिक केसरी



आज प्रसिद्ध आधुनिक केसरी जनचर्चा वाचली.या व्यासपीठावर व्यक्त झालेली मते महत्त्वपूर्ण आहेत. महाराष्ट्रात 'अवकाळीने ' शेतकऱ्यांची अक्षरशः अवकळा केली आहे. प्रचंड प्रमाणात गारपीट होऊन हातातोंडाशी आलेला घास हिरावून घेतला गेला आहे.आज शेतकरी राजा,बळीराजा देशोधडीला लागला आहे. दखल घ्यायला ,अश्रू पुसायला,आर्थिक मदत म्हणून कोणीही दाता सरसावले नाही कारण, निवडणुकीतील लोकशाहीचा महाउत्सव जोरात सुरू आहे. 'ब्रेकिंग न्यूज ' फक्त एकमेकांच्या उखाळ्या,पाखाळ्या काढणाऱ्यांची 'हेडलाईन्स ' होत आहे.शेतकरी, कामगार, बेरोजगार, दुष्काळ,पाण्याची समस्या, तरुण तरुणी यांच्या रोजगारांच्या व्यथा वेदनांवर पुसटशी वाच्यता करायला कोणीही तयार होत नाही. जागतिक तापमान वाढीमुळे भेडसावणारी समस्या त्यातून उदभवणारे अनेक प्रश्न याबाबत आज कोणीच बोलायला तयार नाहीत. पर्यावरणरक्षण, निसर्गप्रेम, पाणीटंचाई व शेतमालाच्या भावाची चिंता यावर कोणीही भाष्य करत नाही. जो तो निवडणुकीच्या आखाड्यात आपला सारीपाट कसा रेटता येईल व सर्व सुखेनैव कसा करता येईल या अहमिकेत मश्गूल आहे. जनता, शेतकरी, कष्टकरी आपल्या विवंचनेत आहे. काही दशकांपूर्वी समाजकारण 80 टक्के होतं, राजकारण सोयीने होत होतं. ते आज वर्षाचे सगळे दिवस 24 तास शत प्रतिशत होताना दिसत आहे. मूळ विषयाला बगल दिली जाते आहे. राष्ट्रसंत तुकडोजी महाराज यांचं प्रबोधन आवर्जून उदाहरणादाखल द्यावेसे वाटते... सर्व ग्रामासि सुखी करावे,अन्न वस्त्र पात्रादि द्यावे!! परि स्वतः दुःखचि भोगावे,भुषण तुझे ग्रामनाथा!! कष्ट करोनि महाल बांधसी, परि झोपडीहि नाही नेटकी!! स्वातंत्र्याकरिता उडी घेशी, मजा भोगती इतरचि !! ऐशा भोळ्या शंकरासि, सौख्य लाभावे सर्व देशी! जिथे निसर्गाने अती केली तिथे शेतकऱ्यांची माती झाली. जडलेला राजकीय विकार ठेवा बाजूला मदतीचा हात द्या शेतकऱ्याला. मतदार राजा हा जरी एक दिवसाचा असेल तरी लोकशाहीची मूल्ये जतनासाठी, व्यवस्थेच्या परिवर्तनासाठी प्रचंड ताकद त्यात असते हे विसरून चालणार नाही. आधुनिक केसरी हेच सामाजिक प्रश्न संवेदनशीलपणे सडेतोड मांडणारे दैनिक म्हणून नावारूपास येत आहे.


**वसंत राठोड, चेंबूर, मुंबई**



विशेष
केसरी
दुष्काळ, पाणी, शेती, रोजगार आणि जगण्याच्या प्रश्नांवर नेते बोलणार का ?

**मतदार राजाची खदखद व्यक्त...**

दुष्काळ, पाणी, शेती, रोजगार आणि जगण्याच्या प्रश्नांवर नेते बोलणार का या बाबतची दै. आधुनिक केसरीमधील जनचर्चा वाचली.लोकसभा निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर मतदार राजाची खदखद यानिमित्त दिसून आली. एक दिवस राजा आणि पुढील पाच वर्षे त्याच्याकडे ढुंकूनही पहायचे नाही हे आपण अनुभवतोच आहोत. 'मेरा पॉवर ।इरा व्होट है 'हे केवल जीवनतारे यांनी व्यक्त केलेले मत योग्यच आहे. पण आपल्या सारख्या सामान्यांचे नेमके कुठे चुकते हे ' तुम्ही फक्त पावशेरी द्या ' या काव्यातून किशोर भालेराव यांनी चपखलपणे सांगितले आहे. 'लोकशाही वाचवण्यासाठी मतदाराने जागृत व्हावे ' ही अपेक्षा प्रा.डॉ. सतीश मस्के यांनी प्रभावीपणे व्यक्त केली आहे. डॉ. हरीश धुरट यांनी ' खोट्या लोकप्रतिनिधींचा मतपेटीतून उपचार झाला पाहिजे ' असा सडेतोड विचार मांडला आहे. इतरही लेखकांनी सडेतोड प्रश्न उपस्थित केले आहेत. दै. आधुनिक केसरी नेहमीच सामान्य लोकांचा आवाज बनत आहे. सडेतोड प्रश्न उपस्थित करणाऱ्या सर्व मान्यवरांचे व त्या प्रश्नांना वाचा फोडण्यासाठी व्यासपीठ उपलब्ध करून देणाऱ्या दै. आधुनिक केसरीच्या संपूर्ण टीमचे मनःपूर्वक अभिनंदन... !



**श्री. सुदाम कृष्णाजी विश्वे, (निवृत्त कलाशिक्षक), पुणे**



# मुलांवर संस्कार करणे ही घरांची जबाबदारी

## 'टीनेजर' लघुपट प्रदर्शनानंतर मान्यवरांचे मत

आधुनिक केसरी न्यूज

**जालना :** भारतीय संस्कृती चांगली असली तरी सामाजिक व्यवस्था बिघडलेली असल्यामुळे मुलांवर संस्कार करणे ही प्रत्येक घराची जबाबदारी आहे, असे मत 'टीनेजर्स' या लघुपटाच्या प्रदर्शन सोहळ्यात मान्यवरांनी व्यक्त केले. उत्कर्ष थिएटर्स व विनोदराय इंजिनिअर्स निर्मित आणि सुमीत शर्मा लिखित, दिग्दर्शित 'टीनेजर्स' या लघुपटाचे प्रदर्शन 11 एप्रिल रोजी जेईएस महाविद्यालयात झाले. या कार्यक्रमास डॉ. सुरेश साबू, डॉ. प्रकाश अंबेकर, डॉ. सुजाता देवरे, प्राचार्य डॉ. गणेश अग्निहोत्री, उद्योजक सुनील रायठठ्ठा यांची प्रमुख उपस्थिती होती. काही दिवसांपूर्वी जालना शहरात कॅफे कांड उघडकीस आल्याने खळबळ उडाली होती. काही कॅफेंमध्ये पोलीसांनी छापे टाकून महाविद्यालयीन युवक युवतींची अनैतिक कृत्ये उघडकीस आणली होती. 'टीनेजर्स' लघुपटाने या घटनेच्या मुळाशी जाऊन पालकांना व युवकांना संस्कारांचा संदेश दिला आहे. आपल्या मुलांकडे लक्ष देणे ही घरांची जबाबदारी असल्याचे मत प्राचार्य डॉ. गणेश अग्निहोत्री यांनी व्यक्त केले तर मनासाठी लस म्हणजे संस्कार व संस्कृतीच आहे असे प्रतिपादन सुनीलभाई रायठठ्ठा यांनी केले. युवा पिढीला टीनेज मध्येच सावरण्याची गरज डॉ. सुजाता देवरे यांनी व्यक्त केली. मुले भरकटतात कारण त्यांच्याशी घराचा संवाद नसतो. तो संवाद वाढवला पाहिजे असे डॉ. प्रकाश अंबेकर म्हणाले. हा लघुपट समाजातील सर्व स्तरापर्यंत जावा अशी तळमळ डॉ. सुरेश साबू यांनी व्यक्त केली. या लघुपटात सतीश लिंगडे व सुमीत शर्मा, रेखा चव्हाण, सुंदर कुँवरपुरिया, निकिता खरात, राहुल काळे, सुनील गव्हाणे, तेजस्विनी वाघमारे, ओंकार बिनीवाले, चंचल पंचवटकर, सुशांत खरात, गणेश लोखंडे, पवन खांदे, सोहन भुरेवाल, नैनी चौकी यांनी अभिनय केला आहे. संपादन अभिजित चव्हाण व संगीत सुमित पावले यांचे आहे. या कलावंतांचा सत्कारही या वेळी करण्यात आला. कार्यक्रमास कवयित्री संजीवनी तडेगावकर, पंडितराव लवटे, ज्ञानेश्वरी लवटे, उदय शिंदे, प्रा. डॉ. यशवंत सोनुने, राजेभाऊ मगर, प्रा. राजेंद्र सोनवणे, प्रकाश कुंडलकर, प्रा. रंगनाथ खेडेकर, मिलिंद दुसे, गजानन मापारी, अजित पळसकर आदींची उपस्थिती होती. सूत्रसंचालन विनोद जैतमहाल यांनी केले.

# बजाज फायनान्सतर्फे बहुतांश कालावधीसाठी मुदत ठेवींच्या व्याजदरात 60 अंशांपर्यंत वाढ

## सर्वोच्च दर 8.85 % पासून प्रारंभ

आधुनिक केसरी न्यूज

**ज्येष्ठ नागरिकांसाठी 42 महिन्यांच्या मुदत ठेवींवरील व्याजदर हा सर्वाधिक 8.85 टक्क्यांवर**

**ज्येष्ठ नागरिकांसाठी निवडक ठेवींच्या प्रकारांसाठी व्याजदरात 0.60 टक्क्यांपर्यंत वाढ**

**बजाज फायनान्सच्या सर्वोच्च व्याजदर असलेल्या मुदत ठेवी सुरक्षित, उच्च-उत्पन्न आणि स्थिर उत्पन्न कमाईचा पर्याय ठेवीदारांना प्रदान करतात.**

**छत्रपती संभाजीनगर :** देशातील सर्वात मोठ्या वित्तीय सेवा समूहांतील बजाज फिनसर्व्हचा एक मुख्य भाग असलेल्या बजाज फायनान्स लिमिटेडने आपल्या मुदत ठेव (एफडी) योजनांच्या बहुतांश कालावधीसाठी व्याजदरात वाढीची महत्वपुर्ण घोषणा केली.

कंपनीने ज्येष्ठ नागरिकांसाठी 25 ते 35 महिन्यांच्या कालावधीतील मुदत ठेवींच्या व्याजदरात 60 अंशांपर्यंत (0.6 टक्क्यांपर्यंत) वाढ केली आहे. तर 18 ते 24 महिन्यांच्या कालावधीसाठी व्याजदरात 40 अंशांपर्यंत (0.4 टक्क्यांपर्यंत) वाढ केली आहे. ही दरवाढ 3 एप्रिल 2024 पासून अंमलात आली आहे. बिगर ज्येष्ठ नागरिकांसाठी, 25 ते 35 महिन्यांच्या कालावधीतील ठेवींसाठी व्याजदर 45 अंशांपर्यंत (0.45 टक्क्यांपर्यत) वाढवण्यात आले आहेत. तर 18 आणि 22 महिन्याच्या कालावधीसाठी व्याजदर 40 अंशाने (0.40 टक्क्यांनी) तर 30 आणि 33 महिन्याच्या कालावधीसाठी 35अंशांनी (0.35 टक्क्यांनी) व्याजदर वाढवण्यात आले आहेत. कंपनीचे हे पाऊल बाजारातील सध्याच्या परिस्थितीत स्थिर आणि उत्तम परतावा मिळवण्याची संधी बचत करणाऱ्या व्यक्तींना देत आहे.

ज्येष्ठ नागरिक त्याच्या डिजिटल मुदत ठेवींसाठी 8.85 टक्क्यांपर्यंत व्याजदर मिळवू शकतात, तर बिगर ज्येष्ठ नागरिक 42 महिन्यांच्या कालावधीसाठी डिजीटल मुदत ठेव योजनांकरिता 8.60 टक्क्यांपर्यंत व्याजदरांचा लाभ घेऊ शकतात. बजाज फायनान्सच्या मुदत ठेवी आणि गुंतवणूक विभागाचे प्रमुख सचिन सिक्का म्हणाले, "स्थिरता शोधणाऱ्या गुंतवणूकदारांसाठी ठेवींच्या अनेक गुंतवणूक प्रकारांत व्याजदर वाढवत आम्ही आकर्षक प्रस्ताव सादर केलेले आहेत. गेली अनेक वर्ष लाखो ठेवीदारांनी बजाज ब्रॅण्डवर त्यांचा दृढ विश्वास कायम ठेवलेला आहे. त्यांना उत्तम अनुभव प्रदान करत राहणे, अधिक मूल्य सादर करणे आणि गुंतवणूकीसाठी सुरक्षित असा पर्याय देणे यावर आमचे लक्ष सतत केंद्रीत राहणार आहे."

बजाज फायनान्सच्या 31 मार्च 2024 अखेर 83.64 दशलक्ष ग्राहक फ्रँचाईझी कार्यरत आहेत. तसेच बजाज फायनान्स 31 मार्च 2024 अखेर देशातील सर्वात मोठी ठेव संकलन करणारी एनबीएफसी (NBFC) कंपनी ठरली आहे. 31 मार्च 2024 पर्यंत कंपनीच्या एकूण ठेवींची रक्कम 60,000 कोटी रुपये इतकी आहे. बजाज फायनान्सच्या ॲपवर 31 डिसेंबर 2023 पर्यंत एकूण 49.19 दशलक्ष वापरकर्ते होते. DATA.IO या संस्थेच्या अहवालानुसार बजाज फिनसर्व्ह ॲप हे भारतात PLAYSTORE वर वित्तीय डोमेनमध्ये सर्वाधिक डाउनलोड झालेले चौथ्या क्रमांकाचे ॲप ठरले आहे. बजाज फायनान्सच्या मुदत ठेव योजनांना क्रिसीलच्या AAA/स्टेबल आणि इक्राच्या AAA (स्टेबल) असे सर्वोच्च स्थिरतेचे रेटिंग (मानांकन) प्रदान झालेले आहे, हे रेटींग कंपनीच्या ठेवी या गुंतवणूकदारांसाठी सर्वात सुरक्षित गुंतवणूक पर्याय असल्याचे सूचित करते. कंपनीचे ॲप गुंतवणूकीसाठी एक उत्तम मंच ठरला आहे. या ॲपवर ग्राहक म्युच्युअल फंडांच्या विस्तृत श्रेणींची निवड करुन आपली गुंतवणूकसुध्दा सुरु करू शकतात.

# आकडे बहाद्दरांवर धडाकेबाज कारवाई

आधुनिक केसरी न्यूज



**सुधाकर जेठे**

**फुलंब्री :** तालुक्यातील गुरुवार रोजी बाबरा, आडगाव (भू) आडगाव (खु) खामगाव, निधोना तालुका फुलंब्री या चार गावात महावितरण कंपनीच्या अधिकाऱ्यांनी आकडे बहादराविरुद्ध गुरुवारी कारवाई केली. यात 18 आकडे बहादरांविरुद्ध चिकलठाणा पोलीस ठाण्यात गुन्हे दाखल करण्यात आले.

यादरम्यान 197300/रुपये किमतीची वीज चोरी झाल्याचे उघड झाले याबाबत महावितरण कंपनीच्या अधिकाऱ्यांनी दिलेली माहिती कशी की, तालुक्यातील चार गावात अचानक आकडेबहादरावर कारवाई करण्यात आली यात जगन्नाथ एकनाथ भगवंता अप्पासाहेब विश्वनाथ पंडित विष्णू हनुमंता गाडेकर नयया भागूबा तुपे अनिल देवलाल चारभरे संजय अण्णा अनदाते महिपत देऊबा सोनवणे हसन युसुफ शेख अलीम शेख सरदार कलीम शेख सरदार योगेश रामप्रसाद वैष्णव मनोज सुपडू नरवडे शेख अलीम शेख सुभान हाफिज जम्मू शेख सुरेश गंगाराम नरवडे रफिक हसन शेख गोरख येडुबा गाडेकर येडोबा पुंडलिक गाडेकर रवींद्र विष्णू जाधव असे गुन्हा दाखल करण्यात आलेल्या नागरिकांचे नावे आहेत. या आरोपींनी सुमारे 197300 रुपये किमतीची वीज चोरी केल्याचे निष्पन्न झाले असल्याने संबंधितावर चिखलठाणा पोलीस ठाण्यात महावितरण पाथरी शाखा तालुका फुलंब्री सहाय्यक अभियंता मयूर नामदेव गुजर यांच्या फिर्यादीवरून वीज चोरीचा गुन्हा दाखल केला.

# मतदारांनो जिंका मोटारसायकल, रेसिंग सायकल आणि मोबाईल

आधुनिक केसरी न्यूज



**चंद्रपूर :** लोकसभा सार्वत्रिक निवडणुकीत मतदानाची टक्केवारी वाढावी, सर्व स्तरातील, वयोगटातील मतदारांनी अधिकाधिक संख्येने मतदान करावे तसेच नवमतदार म्हणजेच युवा वर्गाचा यात मोठ्या प्रमाणात सहभाग वाढावा, यादृष्टीने जिल्हाधिकारी कार्यालयातर्फे 'तुमचे मत द्या आणि आकर्षक बक्षीसे जिंका' ही स्पर्धाआयोजित करण्यात आली आहे. विशेष म्हणजे यात सहभाग घेऊन विजेत्या ठरणा-या पहिल्या तीन मतदारांना अनुक्रमे मोटारसायकल, रेसिंग सायकल आणि मोबाईल मिळणार आहे.

लोकशाही प्रक्रियेमध्ये मतदान करून देशाच्या प्रगतीसाठी, ध्येयधोरणे ठरविण्यासाठी आपला सहभाग नोंदविणे अत्यंत महत्वाचे आहे. 13 - चंद्रपूर लोकसभा मतदार संघाची निवडणूक 19 एप्रिल 2024 रोजी 2118 मतदान केंद्रावर होणार असून सकाळी 7 ते सायंकाळी 6 वाजेपर्यंत मतदानाची वेळ आहे. 18 वर्षांवरील प्रथम मतदार मोठ्या संख्येने असल्याने व युवकांमध्ये मतदानाप्रती उत्साह निर्माण होण्यासाठी प्रशासनातर्फे स्वीप अंतर्गत अनेक उपक्रम राबविण्यात येत आहे.

19 एप्रिल रोजी मतदान केल्यानंतर मतदारांनी शाई लावलेले बोट दाखवत मतदान केंद्रासमोर सेल्फी क्लिक करावा व आपला फोटो अपलोड करून 'तुमचे मत द्या आणि आकर्षक बक्षीसे जिंका' या स्पर्धेत सहभागी व्हावे. फोटो अपलोड करण्यासाठीची लिंक / क्यूआर कोड जिल्हाधिकारी कार्यालयाच्या HTTPS://CHANDA.NIC.IN/EN/DIVISIONS/COLLECTOR-OFFICE-CONTACT-DETAILS/ तसेच जिल्हा परिषदेच्या HTTPS://ZPCHANDRAPUR.CO.IN/ वेबसाईटवर उपलब्ध आहे.

स्पर्धेमध्ये भाग घेणा-या स्पर्धकांकरीता प्रथम पारितोषिक 1 लक्ष 60 हजार रुपयांची अपाची मोटारसायकल, द्वितीय पारितोषिक उच्च प्रतीची रेसींग सायकल आणि तृतीय पारितोषिक ॲड्राईड मोबाईल फोन देण्यात येणार आहे. तरी जास्तीत जास्त नागरिकांनी या स्पर्धेत भाग घ्यावा, असे आवाहन जिल्हाधिकारी विनय गौडा जी.सी. यांनी केले आहे.

# डॉ. बाबासाहेब आंबेडकर जयंतीनिमित्त लोजपातर्फे मोफत चहा, कॉफी वाटप

## भव्य अन्नदान होणार



आधुनिक केसरी न्यूज

**धुळे :** भारतीय संविधानाचे शिल्पकार महामानव डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर यांच्या 133 व्या जयंतीनिमित्त लोकजन शक्ती पार्टी रामविलासच्या वतीने धुळे शहरातील विश्वरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या मध्यवर्ती स्मारकासमोर मोफत चहा कॉफी , व अन्नदानाचा कार्यक्रम आयोजित करण्यात आला आहे. तरी या कार्यक्रमांला नागरिकांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहून लाभ घ्यावा असे आवाहन लोक जनशक्ती पार्टी रामविलास चे उत्तर महाराष्ट्र अध्यक्ष दिलीप आप्पा साळवे यांनी केला आहे.

गेल्या 30 वर्षापासून लोक जनशक्ती पार्टी रामविलास च्या वतीने विविध सामाजिक उपक्रम राबवले जात आहे. याही वर्षी अखंड परंपरा जोपासत उत्तर महाराष्ट्र अध्यक्ष दिलीप आप्पा साळवे यांच्या संकल्पनेतून भारतरत्न डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर यांची 14 एप्रिल रोजी जयंती निमित्ताने पहाटे मोफत चहा कॉफी व सायंकाळी भव्य अन्नदानाचा कार्यक्रम आयोजित करण्यात आला आहे. तरी या कार्यक्रमाला जास्तीत जास्त संख्येने नागरिकांनी लाभ घ्यावा, असे आवाहन ही लोक जनशक्ती पार्टी रामविलासचे उत्तर महाराष्ट्र अध्यक्ष दिलीप आप्पा साळवे यांनी केल आहे. सदर या कार्यक्रमाला धुळे लोक जनशक्ती पार्टी रामविलास च्या महिला जिल्हाध्यक्षा शोभाताई चव्हाण, महासचिव कुंदन खरात, उपाध्यक्ष मधुकर चव्हाण,दत्तू बापू साळवे,सूरज साळवे,पुक्क्या साळवे, प्रमोद सोनवणे, मुरली वाघ, सागर चव्हाण, सागर परदेशी , पत्रकार रवींद्र नगराळे, पत्रकार दिपक वाघ,गौतम वाघ,संदीप त्रिभुवन, रोहित बागुल, शुभम साळवे, योगेश त्रिभुवन, बबलू शिंदे, सजन चौधरी यांसह आदींनी परिश्रम घेतल आहे.

# आठ दिवसांनंतर कांदा लिलाव पूर्ववत

आधुनिक केसरी न्यूज

**नाशिक :** लेव्ही वसुलीच्या वादातून सलग आठ दिवस ठप्प असणारे कांदा लिलाव लासलगाव बाजार समितीत शुक्रवारी सकाळपासून सुरू झाले. पहिल्याच दिवशी सकाळच्या सत्रात १६ हजार क्विंटलची आवक होऊन त्यास सरासरी दीड हजार रुपये भाव मिळाला. इतर बाजार समित्यांमध्ये मात्र कृषिमालाचे व्यवहार अद्याप सुरू झालेले नसल्याने शेतकऱ्यांची कोंडी कायम आहे. बाजार समितीत कृषि मालाच्या खरेदी-विक्रीवेळी आकारल्या जाणाऱ्या हमाली, तोलाई, वाराई वसुलीचा वाद अनेक वर्षांपासून सुरू आहे.

थकीत लेव्हीच्या वसुलीसाठी माथाडी कामगार मंडळाने १२०० ते १४०० व्यापाऱ्यांना नोटीसा काढल्या होत्या. या विरोधात व्यापारी संघटनेने न्यायालयात अपिल करीत स्थगिती मिळवली. नंतर व्यापाऱ्यांनी हमाली, तोलाई कपात करायची नाही, त्यामुळे लेव्हीचा प्रश्न उद्‌भवणार नसल्याचे निश्चित केले. यामुळे माथाडी-मापारी दैनंदिन कामकाजातून बाजुला झाले. जवळपास १५ बाजार समित्यांनी लिलाव बंद ठेवण्याचे जाहीर केले. यामुळे आठ दिवसांपासून कोट्यवधींचे व्यवहार थंडावले. यावर तोडगा काढण्यासाठी जिल्हाधिकारी जलज शर्मा यांनी बोलाविलेली बैठकही निष्फळ ठरली होती. प्रचलित पद्धतीने हमाली, तोलाई आणि वाराई कपात करावी, हा निकष ठेवत कृषिमालाचे लिलाव सुरू करण्याची सूचना शर्मा यांनी केली होती. या घडामोडीनंतर लासलगाव बाजार समिती संचालकांची बैठक झाली. त्यात प्रचलित पद्धतीचा अवलंब करून लिलाव सुरू करण्याचे निश्चित करण्यात आले. त्यानुसार शुक्रवारपासून लासलगाव समितीत लिलाव सुरू सुरू झाल्याची माहिती सचिव नरेंद्र वाढवणे यांनी दिली. सकाळच्या सत्रात कांद्याची ५५० वाहने (अंदाजे १६ हजार क्विंटल) आवक झाली. त्यास किमान एक हजार ते कमाल तीन हजार आणि सरासरी दीड हजार रुपये भाव मिळाला.

# सावळदबारा येथे कोलते कार्यालयात महात्मा फुले जयंती उत्साहात साजरी



आधुनिक केसरी न्यूज

**सोयगाव :** सावळदबारा येथे कोलते भवन कार्यालयात महात्मा ज्योतिबा फुले यांची जयंती मोठ्या उत्साहात साजरी करण्यात आली.महात्मा ज्योतिराव फुले यांची आज जयंती महाराष्ट्राच्या सामाजिक व शैक्षणिक क्षेत्रातील महात्मा फुले आणि सावित्रीबाई फुले यांचं योगदान अनमोल आहे. महात्मा फुले आणि समता हे शब्द जणू हातात हात घालून येतात. महिलांनाही पुरुषांइतकाच शिक्षणाचा अधिकार आहे असं केवळ ज्योतिराव फुले बोलून थांबले नाहीत. तर, प्रत्यक्षात तसा अधिकार महिलांना मिळावा म्हणून त्यांनी आयुष्य वेचलं. स्वतःच्या पत्नीपासून त्यांनी याची सुरुवात केली व पुढं महिलांसाठी शिक्षणाचा राजमार्ग खुला करून दिला.महात्मा फुले यांचे सामाजिक विचार अत्यंत प्रखर होते. बालविवाह व विधवांच्या शोषणाविरोधात त्यांनी आवाज उठवला. सामाजिक समता प्रस्थापित व्हावी म्हणून ते सतत झटत राहिले. महात्मा फुले व सावित्रीबाई फुले यांना स्वतःच्या विचारांसाठी तत्कालीन परंपरावाद्यांकडून शेणाचा माराही सहन करावा लागला. मात्र ते बधले नाहीत असे प्रतिपादन प्राचार्य नारायण कोलते पाटील यांनी गुरूवार दि.११ रोजी कोलते कार्यालयात केले तसेच आजच्या तरूण पिढीने फुले दाम्पत्यांचा आदर्श ठेवून भविष्याची वाटचाल करावी, असेही प्राचार्य कोलते पाटील ते म्हणाले. क्रांतिसूर्य महात्मा जोतीराव फुले यांच्या जयंतीनिमित्त येथील कोलते कार्यालयात क्रांतिसूर्य फुले यांच्या कार्यालयातील फुले यांच्या प्रतिमेस भाजपाचे कार्याकारणी सदस्य मुंकुंदा मानकर,तालुका उपाध्यक्ष पंढरी साबळे व अनुसूचित जाती जमातीचे तालुका अध्यक्ष शांताराम खराटे यांच्या हस्ते पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले. यावेळी पदाधिकारी व कार्यकर्ते उपस्थित होते. अध्यक्ष भाऊराव कोलते पाटील, रामचंद्र चिमणकर,संजय राजपूत,दिपक मानकर,शरीफ तडवी,ग्यानदेव खडके ,संजय चव्हाण देव्हारी ,या कार्यक्रमाचे संयोजन प्रा जीवन कोलते पाटील यांनी केले.अशी माहिती शांताराम खराटे यांनी बोलताना दिली.




# माणुसकी वृद्ध सेवालय येथे महात्मा जोतिबा फुले यांची जयंती साजरी

आधुनिक केसरी न्यूज

**छत्रपती संभाजीनगर :** सु-लक्ष्मि बहुद्देशीय सेवाभावी संस्था व माणुसकी वृद्ध सेवालय जटवाडा रोड संभाजीनगर येथे गुरुवारी, ११ एप्रिल रोजी महात्मा फुले यांची जयंती साजरी करण्यात आली. त्याप्रसंगी ते बोलत होते.सुरवातीला उपस्थित मान्यवरांनी क्रांतीसुर्य महात्मा फुले यांच्या प्रतिमेला अभिवादन करून माल्यार्पण केले.व शिक्षण आणि महिला सक्षमीकरणाच्या क्षेत्रात क्रांतीसूर्य महात्मा फुले यांनी केलेल्या अविश्रांत प्रयत्नामुळे समाजावर ठसा उमटला आहे. त्यांचे जीवन चरित्र समाजासाठी दिशादर्शक, प्रेरणादायी व ऊर्जादायी आहे. महात्मा फुले सामाजिक व शैक्षणिक क्रांतीचे जनक असल्याने प्रत्येकाने महात्मा फुले यांचा आदर्श डोळ्यासमोर ठेवून वाटचाल करावी. असे प्रतिपादन माणुसकी समुहाचे समाजसेवक सुमित पंडित यांनी उपस्थितांना केले.या प्रसंगी विविध मान्यवर व ग्रामस्थ उपस्थित होते व माणुसकी वृद्ध सेवालय येथील वृद्ध उपस्थित होते.

# बाजार सावंगी यात्रेची तयारी; रेणुका माता मंदिरासह प्रवेशद्वाराची रंगरंगोटी

आधुनिक केसरी न्यूज

**सुधाकर जेठे**

**खुलताबाद :** तालुक्यातील बाजार सावंगी येथील समस्त भाविकांचे आराध्य दैवत असलेल्या श्री रेणुका माता मंदिरातील प्रवेश द्वार कमान व गावातून प्रवेशद्वारासाठी बांधलेल्या कमानींना रंगरंगोटी करण्यात आल्याने मंदिराच्या वैभवात भर पडली आहे.

येथील रेणुका माता मंदिर पुरातन असून राज्य शासनाच्या तीर्थक्षेत्र असलेल्या स्थळात समावेश आहे तरीही समस्त ग्रामवासियांनी व भाविकांनी लोकसहभागातून आर्थिक मदतीतून भव्य कमानीची उभारणी केली आहे त्याआधी सभामंडळ व द्विपमाळीची देखील उभा रणी करून तीर्थक्षेत्राला देवदर्शन व वार्षिक यात्रा महोत्सवाला येणाऱ्या भाविकांसाठी सोयी सुविधा पुरवण्याची व दैवताचा लौकिक वाढवण्यासाठी मंदिराचे विश्वस्त ग्रामपंचायत व समस्त भाविकांचा नेहमीच पुढाकार व सहकार्य असल्याने संस्थांसाठी विकासात्मक बाबींवर भर देण्यात आला आहे. येत्या चैत्र शुद्ध पौर्णिमेला यात्रा भरणार असल्याने व ती पंधरा दिवसांची भरत असल्याने मंदिराची तट भिंती व दोन्ही कमानी प्रवेशद्वारांची रंगरंगोटी करून सजावट वाढवण्यात आल्याने भाविका त आनंद व समाधानाचे वातावरण आहे. संस्थान अध्यक्ष भिकन घुले सरपंच आप्पा राव नलावडे मंदिर बांधकाम प्रवर्तक संजय पुंड सोमीनाथ नलावडे ज्ञानेश्वर नलावडे पुंजाजी नलावडे सह आजी-माजी सरपंच सदस्य व ग्रामस्थांचा नेहमीच या कामी पुढाकार असल्याने गावातील श्री विठ्ठल मंदिर श्री गणपती मंदिर हनुमान मंदिर महादेव मंदिर ज्ञानेश्वर माऊली मंदिर या सर्व मंदिरांचा लोकसभागातून जीर्णोद्धार करण्यात येऊन गावच्या दैवतांचा विकास घडवण्याचे ध्येय गाठण्यात आले आहे ही वैभवशाली व इतिहास नोंद व्हावी अशी अभिमानास्पद बाब आहे.



# अजित सीड्स कंपनीची फसवणूक; आरोपी सुरज गायकवाड याचा अटकपूर्व जामीन अर्ज फेटाळला

आधुनिक केसरी न्यूज

**छत्रपती संभाजीनगर :** माळशिरस येथील सुरज कृषी केंद्राचे संचालक सुरज अभिमान गायकवाड आणि हर्षवर्धन दत्तात्रय गायकवाड यांनी अजित सिड्सच्या नावाने बनावट केळीच्या जि-9 बियाणाची विक्री आणि बनावट बिल देऊन फसवणूक केल्याप्रकरणी पोलीस स्टेशन, माळशिरस येथे फिर्याद दाखल करण्यात आली होती.
दि. 5/3/2024 रोजी सुरज अभिमान गायकवाड, हर्षवर्धन दत्तात्रय गायकवाड दोघे रा. पेहे ता. पंढरपूर जि. सोलापुर यांनी अजित सिड्स प्रा. लि. कंपनीचे नावाने बनावट बिल बनवुन तसेच बनावट केळीची रोपे ही अजित सिड्स जि-9 केळीची रोपे आहेत. असे भासवून अजित सिड्स प्रा. लि. कंपनी आणि शेतकऱ्यांची फसवणूक केली आहे . श्री. सुरज अभिमान गायकवाड आणि श्री. हर्षवर्धन दत्तात्रय गायकवाड यांच्या विरुध्द पोलीस ठाणे, माळशिरस येथे गु. र. क्र.८०/२०२४ भा. दं. वि. संहिता, १८६० चे कलम ४२० व ४९९ सह ३४ अंतर्गत फसवनुकीचा गुन्हा दाखल करण्यात आला होता.
अजित सीड्स कंपनींचे अधिकृत विक्रेते विक्रम कैलास पवार हे तालुका माळशिरस साठी नियुक्त केलेले आहेत. त्यांना माळशिरस तालुक्याकरीता अजित सिड्स जी-९ केळीची रोपे हवी होती. ते सातत्याने अजित सीड्सकडे रोपांची 5/2/2024 रोजी पासुन मागणी करत होते. परंतु अजित सीड्सकडे जी-९ केळीची रोपे उपलबध नसल्यामुळे सदर विक्रेत्यांना रोपे देता आली नाही. परंतु दिनांक 2/3/2024 रोजी श्री. विक्रम कैलास पवार यांचा कंपनी प्रतिनिधी श्री. विष्णू भोसले यांना फोन आला की, आम्हाला तुम्ही जी-९ केळीची रोपांचा साठा उपल्ब्ध नाही, असे सांगता आणि माझ्या कार्यक्षेत्रात राहणारे शेतकरी नामे संतोष संपत जाधव, हणुमंत नामदेव जाधव, नवनाथ सुभाष जाधव सर्व रा. जाधववाडी, ता. माळशिरस यांना आमचे परस्पर तुम्ही रोपांचा पुरवठा केला. कंपनी प्रतिनिधी विष्णू भोसले यांनी जाधववाडी येथे भेट दिली. केळीच्या रोपांची पाहणी केली असता केळी रोपे अजित सीड्स नव्हती. इतर कोणत्या तरी कंपनीची असल्याचे दिसून आले. तेव्हा शेतकऱ्यांना विचारले असता आपणास रोपे कोणी दिली. त्यांनी सांगीतले की, सुरज कृषी केंद्राचे मालक सुरज अभिमान गायकवाड व हर्षवर्धन दत्तात्रय गायकवाड यांनी विकत दिल्याचे सांगितले तसेच बिल अजित सिड्स कंपनीच्या नावाने बनावट लक्षात आले. बिल पाहीले असता बिलावर विक्रेते सुरज गायकवाड यांचे सुरज कृषी केंद्राचे नावे असल्याचर दिसून आले. तेव्हा खात्री केली असता सदर बिल हे बनावट असल्याचे दिसुन आले. सदर बनावट बिलाची रक्कम ही श्री. सुरज गायकवाड यांनी श्री. हर्षवर्धन दत्तात्रय गायकवाड यांचे फोन पे नं. 7620208393 यावर स्वीकारल्याचे आढळून आले. फौजदारी जामिन अर्ज क्र. १००/२०२४ मधील नि.क्र. १ खालील आदेश.

प्रस्तुतचा अर्ज अर्जदाराने फौजदारी प्रक्रिया संहिता, १९७३ चे कलम ४३८ अन्वये अटकेपासुन अंतरिम संरक्षण मिळण्याकामी दाखल केला आहे. सदर अर्जात अर्जदाराविरुध्द पोलीस ठाणे, माळशिर स येथील गु.र.क्र.८० /२०२४ भा.दं. वि. संहिता, १८६० चे कलम ४२० व ४९९ सह ३४ अंतर्गत असले ल्या गुन्हयाचा उल्लेख आहे. अर्जदाराने नि.क्र.३ व ५अ च्या यादीसोबत कागदपत्रे अवलोकनासाठी दाखल केली आहेत.
अभियोग पक्षातर्फे म्हणणे नि. क्र. ६ येथे दाखल केले व अर्जास तिव्र विरोध दर्शविला आणि कथन केले की, आरोपी हा गुन्हा दाखल झाल्यापासुन फरार आहे. त्याच्याकडे गुन्ह्याच्या अनुषंगाने तपास करायचा आहे. आरोपीस त्याच्या राहत्या घरी तपासकामी हजर राहणेबाबत समज देणेकरिता गेलो असता, तो गुन्ह्यात तपासात सहकार्य न करता आपले अस्तित्व लपविले आहे. आरोपीने शेतक-यांना अजित सिड्स कंपनीची रोपे आहेत, असे सांगुन त्यांना दुसऱ्या कोणत्या कंपनीचे केळी रोपे दिली होती. साक्षीदार शेतकरी श्री. नवनाथ सुभाष जाधव यांनी श्री. गायकवाड यांच्यावर विश्वास ठेवुन, सदरची सर्व केळीची रोपे शेतामध्ये लागवड केली होती. सदर केळीचे उत्पन्न हे जर अजित सिड्स कंपनी एवढे नाही आले तर, सदर शेतक-याचे कधीही न भरुन येणारे नुकसान होणार आहे. आरोपीने सदरची केळीची रोपे कोठुन आणली आहेत, त्यांने सदर शेतक-याना दिलेले बिल कोठुन बनवले आहे, सदर बिलावरील शिक्का कुठे बनविला आहे, याबाबत आरोपीकडे चौकशी करावयाची आहे. सदरचा शिक्का गुन्ह्याचे तपासकामी जप्त करावयाचा आहे. आरोपीने अगोदर किती शेतकऱ्यांची फसवणूक केली, याबाबत त्याचेकडे चौकशी करावयाची आहे. आरोपी हा पंढरपुर तालुका येथील पेहे गावातील रहीवाशी असून, तो गुन्ह्याचे तपासकामी हजर राहत नाही. आरोपीची अटकपूर्व जामिनावर मुक्तता केल्यास, तो भविष्यात अशा प्रकारचे गुन्हे करुन इतरांची फसवणुक करेल व त्यास कायद्याचे भय राहणार नाही. साक्षीदार व पुराव्यामध्ये हस्तक्षेप करेल आणि मा. न्यायालयाचे अटी व शर्तीचे पालन करणार नाही. शेवटी, अर्ज नामंजुर करण्याची विनंती केली. आरोपीने मुळ वर्दीदारातर्फे दाखल करण्यात आलेल्या कागदपत्रांचे अवलोकन केले. भा.दं. वि. कलम ४२० व ४९९ ही प्रकरणे मा. प्रथम वर्ग न्यायदंडाधिकारी यांचे न्यायालयात संपरीक्षा होणारी आहेत. पोलीसांनी तपासाच्या कामी आरोपीस नोटीस पाठविल्यानंतर, त्यांना मदत किंवा सहकार्य केले नसल्याचे अभियोगपक्षाने म्हणणे आहे. पोलीसांना गुन्हयाच्या कामी सखोल चौकशी करण्याची संधी उपलब्ध करुन देणे, न्यायोचित वाटते. तपासाअंती आरोपीने शेतकऱ्यांची फसवणूक केली किंवा कसे, हे निश्चीत होणार आहे. समाजामध्ये आर्थिक गुन्हयाबाबत जामिन मंजुर केल्यास, वेगळा संदेश जाईल आणि अर्जदार अशाच प्रकार गुन्हे करण्याची शक्यता नाकारता येत नाही. अर्जामध्ये तथ्य व गुणवत्ता आढळत नाही. सबब, हे न्यायालय खालील प्रमाणे आदेश पारीत करीत आहे. आदेश, अर्ज नामंजुर करण्यात आला असून आरोपी सुरज गायकवाड यांचा अटकपूर्व जामीन अर्ज मा. अतिरिक्त सत्र न्यायालय, माळशिरस यांनी फेटाळला आहे. अजित सीड्स कंपनीकडून विधिज्ञ श्री. व्ही. एस. जाधव यांनी काम पाहिले.

## चाँदशहा वलीबाबा कानडगाव -महंमदपूर संदल उरुसात हिंदू -मुस्लिम एकतेचे दर्शन

आधुनिक केसरी न्यूज

**खुलताबाद :** तालुक्यातील कानडगाव -मंहमदपूर जागृत देवस्थान हजरत चाँदशहा वलीबाबा यांच्या संदल व उर्सला दि.१२शुक्रवारी सुरुवात होत आहे दि.१३उर्स यात्रा महोत्सवाचे आयोजन करण्यात आलेआहे. प्रतिवर्षाप्रमाणे याहीवर्षी संदल उर्स महोत्सव मोठ्या उत्साहाने साजरा करण्याची तयारी ग्रामस्थांनी पुर्ण केली आहे.दि.१२रोजी संदल,दि.१३यात्रामहोत्सव,दि.१४कुस्ती आखाडा,तर आज व उद्या १२-१३ रोजी जागरण गोंधळाचा कार्यक्रम नागरिकांच्या मनोरंजनासाठी आयोजित करण्यात आला आहे. येथे एकही मुस्लिम कुटुंब नसताना हिंदू समाज मोठ्या उत्साहात मोठ्या आदबेने श्रध्दा विश्वास ठेवून हजरत चाँदशहा वलीबाबा यांचा संदल उर्स यात्रा महोत्सव साजरा करतात गावातील सर्वच हिंदू बांधव सहभाग घेवून चांद शहा बाबाला विधीवत श्रध्दा ठेवत मन्नत ने मागणी करतात व श्रध्दाळुना याचा फायदा होतो असे श्रध्दाळु मानतात बोलतात. यात सामाजिक कार्यकर्ते तथा काँग्रेस सेवा दलाचे सुरेश जाधव पुढाकार घेऊन मोठ्या हिरीरीने सहभाग घेत उत्सव साजरा करण्यात सतत मदतीला पुढे असतात या धार्मिक संदल उर्स यात्रा महोत्सवाचा पंचक्रोशीतील भाविक भक्त नागरिकांनी लाभ घ्यावा असे आवाहन ही कानडगाव मंहमदपूर ग्रामस्थांनी केले आहे.



## येत्या १९ एप्रिल रोजी नागपूर येथे मतदान करण्यासाठी सशुल्क विशेष बसची सुविधा

आधुनिक केसरी न्यूज



**पुणे :** निवासी नागपूरकर युवकांना तसेच नागरिकांना येत्या १९ एप्रिलच्या लोकसभेच्या मतदानासाठी सशुल्क बस सेवा विदर्भ मित्र मंडळातर्फे करण्यात आली आहे. भारतीय लोकशाही ही जगातील सर्वात मोठी लोकशाही पद्धत असून प्रत्येक नागरिकाने मतदान करणे हे राष्ट्रीय कर्तव्य आहे. मतदानाने आपली लोकशाही अधिक सशक्त बनते. देशाच्या हितासाठी मतदान करणे आवश्यक आहे.
यावेळेसची लोकसभेची निवडणूक म्हणजे देशाचे नव्हे तर संपूर्ण विश्वाचे भवितव्य ठरविणारी असल्याने देशहितासाठी शंभर टक्के मतदान व्हावे तसेच हिंदू,मुस्लिम,शीख,इसाई असा धर्माधारित भेदभाव न करता एक सशक्त सरकार पुनश्च निवडून यावे याकरिता शंभर टक्के मतदान करणे गरजेचे आहे. सध्या नागपूर ला जाण्यासाठी रेल्वे व बसेस ची आरक्षणे फुल्ल आहेत. त्यामुळे सर्व अडचणींवर मात करून नागरिकांनी लोकशाहीमध्ये लोकसभा मतदानाचा हक्क बजवावा असे नम्र आवाहन प्रबोधन मंच, विदर्भ वासी पुणे निवासी, विदर्भ मंडळ यांच्या वतीने करण्यात आले आहे. ज्यांची नावे नागपूर मतदार यादी मध्ये आहेत पण सध्या पुण्यात नौकरी निमित्त रहायला किंवा शिक्षणासाठी, व्यवसायासाठी किंवा काही कामासाठी आले आहेत अश्यांना नागपूरला (१९ एप्रिल) मतदानाला जाण्यासाठी विदर्भ मित्रमंडळ तर्फे सशुल्क बसेस ची व्यवस्था करण्यात आली आहे तरी इच्छुक मतदान करणाऱ्या नागरिकांनी अधिक माहितीसाठी श्रीपाद उर्फ छोटू बोरीकर यांच्याशी संपर्क करावा. संपर्कासाठी त्यांचे भ्रमण ध्वनी क्रमांक ९८८११२००३६९ किंवा ७५१७७७३६९ हे आहेत. या मोबाईल वर संपर्क करावा.

## मुंबई विमानतळावरून दोन कोटींचे सोने जप्त

आधुनिक केसरी न्यूज

**मुंबई :** छत्रपती शिवाजी महाराज आंतरराष्ट्रीय



विमानतळावर सीमाशुल्क विभागाने केलेल्या कारवाईत दोन परदेशी महिलांसह तिघांना अटक केली. त्यांच्याकडून साडेतीन किलो सोने जप्त करण्यात आले असून सोन्याची किंमत दोन कोटी रुपये आहे. रुबिना बानो शेख (४१), मेरी मेला व मायला ओर्डोनेझ अशी अटक करण्यात आलेल्या महिलांची नावे आहेत. यातील शेख ही मुंबईतील मालवणी परिसरातील रहिवासी आहे, तर मेरी व मायला दोघीही फिलिपिन्स देशाच्या रहिवासी आहेत. विमानतळावरून शेखला अटक करण्यात आली. चौकशीत दोन परदेशी महिलांनी शौचालयामध्ये सोन्याची भुकटी लपून ठेवली होती. तिला त्यासाठी २० हजार रुपये मिळाणार होते. हे सोने मेरी व मायला यांनी शेखला दिले होते. त्यानंतर त्यांनी शौचालयात सोने लपवले होते.





# संजय काळे यांचा वक्राकार दरवाजांना विरोध

## नांदूर मधमेश्वर धरणास वक्राकार दरवाजामुळे आंतरराष्ट्रीय रामसर कराराचा होणार भंग

आधुनिक केसरी न्यूज

**कोपरगाव :** जानेवारी २०२० मध्ये 'रामसर साइट' म्हणून घोषित झालेल्या भारतात नऊ ठिकाणांपैकी महाराष्ट्रातील नांदूरमध्यमेश्वर पक्षी अभयारण्याला व तिथल्या दलदलीला 'रामसर साइट' म्हणून घोषित केले गेले त्याला महाराष्ट्रातील पहिले 'रामसर साइट' होण्याचा बहुमान मिळाला मात्र या नांदूरमध्यमेश्वर धरणास १० वक्राकार दरवाजे झाल्यास धरणातील पाणथळ जागा नष्ट होऊन पक्ष्यांना खाद्य न राहता जलसृष्टी नष्ट होऊन पक्षी अभयारण्य उद्ध्वस्त होईल, अशी भीती गोदावरी खोरे पाणी अभ्यासक सामाजिक कार्यकर्ते संजय काळे यांनी व्यक्त केली आहे.

सन १९७१ ला इराण देशातील रामसर येथे नव्वद देशांचे संमेलन झाले. या संमेलनात जगातील ९० देशांनी दलदल असलेले प्रदेश, साइट संरक्षित क्षेत्र जाहीर करण्याचे ठरवले. या संमेलनात भारत देश सहभागी होता. सन १९७५ ला हा रामसर साइट करार सर्व देशांनी अंमलात आणण्यास सुरुवात केली. तर २७ जानेवारी २०२० मध्ये भारतात नऊ ठिकाणे 'रामसर साइट' म्हणून घोषित झालेत.



नांदूरमध्यमेश्वर येथील पक्षी अभयारण्य व नांदूरमध्यमेश्वर उन्नयी बंधारा परिसरास आंतरराष्ट्रीयस्तरावर 'रामसर साइट' म्हणून संबोधन करण्यात आले आणि नांदूरमध्यमेश्वर पक्षी अभयारण्याला व तिथल्या दलदलीला 'रामसर साइट' म्हणून घोषित केले गेले आणि त्याला महाराष्ट्रातील पहिले 'रामसर साइट' होण्याचा बहुमान मिळाला. नांदूरमध्यमेश्वर प्रकल्पात ५२६ प्रकारची जल व जमिनीवरील झाडी, वेलींच्या जाती, प्रजाती, आठ सस्तन व २३६ प्रकारचे पक्षी या दलदल पानथळ जागेवर अढळतात. त्यात ८० पक्ष्यांच्या प्रजाती परदेशातून येतात.

**आंतरराष्ट्रीय रामसर कराराचा भंग होणार :** केवळ अतिक्रमणे वाचवून पैसे कमवण्याचे नादात नांदूरमध्यमेश्वर धरणातील पाणथळ दलदल नष्ट होणार असून त्यामुळे आंतरराष्ट्रीय रामसर कराराचा भंग होणार आहे . निसर्ग व जीव सृष्टी वाचवा . एक निसर्ग प्रेमी म्हणून जलसंपदा विभागाचे दरवाजे बसवणेच्या प्रकल्पाला कडाडून विरोध करतो .
**– संजय भास्करराव काळे, गोदावरी खोरे पाणी अभ्यासक**

फ्लेमिंगो हा पक्षी ऑस्ट्रेलियावरून प्रवास करून नांदूरमध्यमेश्वरला येतो.

तसेच नांदूरमध्यमेश्वरला २४ प्रकारच्या गोड्या पाण्यातील माशांच्या प्रजाती आढळतात व ४१ प्रकारच्या फुलपाखरांच्या प्रजाती येथे आढळतात म्हणून नैसर्गिक सौंदर्याचा भाग म्हणून नांदूरमध्यमेश्वर आंतरराष्ट्रीय दर्जाचे पाणथळ दलदल 'रामसर साइट' म्हणून घोषित झालेले आहे. गोदावरी नदीवर निफाड तालुक्यातील नांदूरमध्यमेश्वर येथे ११०४ मीटर लांब, ५ मीटर रुंद व १५ मीटर खोल भिंत बांधून १९०८ ला ब्रिटिशांनी गोदावरी उजवा व डावा कालव्यांसाठी नांदूरमध्यमेश्वर उन्नेयी बंधारा बांधला. धरणाच्या भिंतीमुळे गोदावरी नदीकाठचे २९६ हेक्टर जमिनीचे क्षेत्र पाण्याखाली गेले म्हणून तत्कालीन ब्रिटिश शासनाने जमीन अधिग्रहित केली. गेले १०० वर्षे गोदावरी डावा व उजवा कालवे बारमाही असल्यामुळे नांदूरमध्यमेश्वर उन्नेयी बंधाऱ्यात दलदल निर्माण झाली. त्यात जैविकदृष्ट्या महत्त्व असलेल्या झाडांच्या, जलचरांच्या प्रजाती निर्माण होऊन अंतरराष्ट्रीय दर्जाचे नैसर्गिक स्थान बनले. नांदूरमधमेश्वर बंधाऱ्यावरील गावांमध्ये नदीकाठी गाळपेर जमीनीवर मोठी अतिक्रमणे झाली. तेथे बेकायदेशीर बांधकामे झाली. बेकायदेशीर वीट भट्ट्या झाल्या. नव्याने बांधलेल्या पुलाचे रेखांकनात चुक होऊन पुल पूराचे पाण्याखाली जाऊन दळणवळण तुटते असे कारणे देऊन नांदूरमधमेश्वर भिंतीला दरवाजे बसवण्याचा घाट स्थानिक लोकप्रतिनिधी व जलसंपदा विभागाने घातला आहे मात्र या दरवाजांमुळे पुराच्या पाण्यात सर्व जलसृष्टी उध्वस्त होणार असून पक्षांना खाद्य राहणार नाही म्हणून पक्षी अभयारण्य उध्वस्त होणार आहे.



# सपोनि प्रफुल्ल साबळे यांनी मुस्लिम बांधवांना गुलाबपुष्प देऊन ईदच्या दिल्या शुभेच्छा

## सावळदबारा, फर्दापूर येथे रमजान ईद मोठ्या उत्साहात साजरी

आधुनिक केसरी न्यूज

**सोयगाव :** तालुक्यातील सावळदबारा व फर्दापूर येथे परिसरात गुरुवारी ईद-उल फित्र मोठ्या उत्साहात साजरी करण्यात आली. सकाळी ८.३० वाजता ईदची नमाज अदा करण्यात आली. जामा मशिदीचे इमाम अलीम कादरी यांनी ईद- उल-फित्रच्या नमाजाचे नेतृत्व केले. यावेळी ईदगाह येथे सहायक पोलीस निरीक्षक प्रफुल्ल साबळे यांनीही मुस्लिम बांधवांना ईदच्या शुभेच्छा दिल्या. यावेळी फर्दापूर विविका सोसावटीचे अध्यक्ष जगन्नाथ गावंडे, माजी ग्रा.प सदस्य विलास बराडे, भीमराव बोराडे, ग्रां.प सदस्य राहुल दामोदर, विजय तायडे आदींनीही ईदगाह येथे लोकांना ईदच्या शुभेच्छा दिल्या त्याचवेळी फर्दापूर पोलीस ठाण्याचे वतीने रमजान ईद मधे कोणत्याही प्रकारचा अनुचित प्रकार घडू नये यासाठी पोलिस सहाय्यक पोलीस निरीक्षक प्रफुद्ध साबळे, पोलीस नाईक नीलेश लोखंडे, पो.कॉ. भरत कोळी, पगारे, पोलीस कर्मचारी व होमगार्ड यांनी चोख बंदोबस्त बंदोबस्त ठेवला होता.फर्दापूर पोलीस ठाण्याच्या वतीने ईदगाह येथे शरबतची व्यवस्था करण्यात आली होती. यावेळी मुस्लिम बांधवांनी फर्दापूर पोलीस ठाण्याचे सहाय्यक पोलीस निरीक्षक प्रफुद्ध साबळे व पोलीस कर्मचा-यांचे आभार मानले. ईदच्या अनुषंगाने फर्दापूर पोलीस स्थानकात कार्यक्षेत्र विविध गावांच्या नमाज गणनेसाठी आले होते. रमजान ईदच्या अनुषंगाने मौजे सावळदबारा गावाचे ठिकाणी मौलाना यांनी नमाज पठण केले. सदर नमाज पठणाच्या सुमारे ३०० ते ४०० जनसमुदाय तसेच गावातील प्रतिष्ठित व्यक्ती सरपंच, उपसरपंच व ग्रामपंचायत सदस्य, ग्रामस्थ मुजावर व मुस्लिम बांधव मोठ्या संख्येने उपस्थित होते.सदर नमाजपठणाचा कोणताही अनुचित प्रकार होऊ नये याकरिता फर्दापूर पोलिस ठाण्याचे सपोनि प्रफुल्ल साबळे यांच्या मार्गदर्शनाखाली बिट जमादार मिरखॉ तडवी यांनी चोख बंदोबस्त ठेवला होता.नमाज पठणाचा कार्यक्रम शांततेत संपन्न झाला नंतर पोलिस सहायक पोलीस निरीक्षक प्रफुल्ल साबळे यांच्या शुभहस्ते फर्दापूर येथे नमाज पठण करत आहेत लहान मुले, नंतर समस्त मुस्लिम बांधवांना लिंबू सरबत व पुष्पगुच्छ देऊन स्वागत केले व त्यांना रमजान ईदच्या द्वारे सामाजिक सलोखा संदेश देऊन शुभेच्छा दिल्या आहे.

# अ. भा. जैन दिवाकर राष्ट्रीय कार्याध्यक्षपदी इंजि.यशभाई प्रमोद शहा

आधुनिक केसरी न्यूज



**अहमदनगर :** प.पु.राष्ट्रसंत पूज्य गुरुदेव श्री कमलमुनी कमलेशजी म.सा. अखिल भारतीय जैन दिवाकर मंच, नवी दिल्ली युवा शाखेची राष्ट्रीय कार्यकारिणीमध्ये इंजि. यशभाई प्रमोद शहा,अहिल्यानगर (अहमदनगर) यांची राष्ट्रीय कार्याध्यक्ष पदी नियुक्ती करण्यात आली. जैन दिवाकर मंच संपूर्ण भारतातील सर्व राज्यांमध्ये समाजाच्या सर्व प्रश्नांवर काम करत आहे.गुरुदेवांनी आता विशेषतः विरांगनांचा समाजात सन्मान, आदर आणि त्यांना स्वावलंबी बनविण्याचे काम हाती घेतले आहे तसेच गो मातेला राष्ट्रीय दर्जा मिळवून देण्यासाठी संपूर्ण प्रयत्न करत आहेत. त्यांनी गो मंत्रालय बनवण्याचे काम हाती घेतले आहे.म्हणूनच राष्ट्रसंत भारतभर पदभ्रमण करत आहेत. इंजि.यशभाई प्रमोदजी शहा (अहिल्यानगर, महाराष्ट्र राज्य) यांची नियुक्ती करताना राष्ट्रसंतजी यांनी सांगितले की यशभाई लहान वयात समाजासाठी खूप चांगले योगदान देत आहेत. अशा तरुणांनी पुढे येण्याची नितांत गरज आहे.यशभाईंच्या सामाजिक कार्याची दखल घेऊन आज त्यांची राष्ट्रीय युवक कार्याध्यक्ष पदावर नियुक्ती करण्यात येत आहे.अल्पसंख्यांक, गोसेवा,साधू-साध्वी गुरु भगवंत यांना विहार दरम्यान पोलीस संरक्षण देणे अशा अनेक कामांवर ते गेली अनेक वर्षे अतिशय उल्लेखनीय काम करत आहेत. यशभाई हे उच्चशिक्षित सिव्हिल इंजिनीअर असून बांधकाम व्यावसायिक आहेत,त्यांचे काम सांभाळताना वेळ काढून सामाजिक कार्यात हातभार लावणे ही फार मोठी गोष्ट आहे. फार कमी लोक, विशेषतः तरुण पिढीतील उच्चशिक्षित तरुण समाजासाठी वेळ काढून समाजाप्रती आपले कर्तव्य पार पाडत आहेत.अशा तरुणांची टीम बनवण्याची जबाबदारी,तसेच गोसेवा, अल्पसंख्यांक आणि विहार संबंधित कामांची विशेष जबाबदारीही राष्ट्रसंतजींनी यशभाईंवर सोपवली आहे. या नियुक्तीबद्दल प.पू. कैवल्यरत्नाश्रीजी (कैवल्यधाम) साध्वी गुरु महाराज जी व इतर अनेक प.पू. साधु- साध्वी गुरु भगवंतांनी आशीर्वाद दिले व अभिनंदन केले.यशभाई, तुमची जबाबदारी आणखी मोठी झाली आहे, तुम्ही जिन शासन चे काम असेच करत रहा असे सांगितले. यशजींच्या नियुक्तीबद्दल समाजातील सर्व क्षेत्रातील मान्यवरांनी त्यांचे अभिनंदन केले. यावेळी यशजींनी राष्ट्रसंत कमलमुनी कमलेश जी गुरु महाराज व सर्व गुरु भगवंतांना नमन केले व कृतज्ञता व्यक्त केली.तुम्ही माझ्यावर दिलेली जबाबदारी निश्चितपणे पार पाडण्याचा प्रयत्न करेन आणि आपण दिलेल्या जबाबदारीवर काम करण्यासाठी टीम बनवून लवकरच मीटिंग आयोजित करेन असे सांगितले. सर्वांनी दिलेल्या शुभेच्छांबद्दल मान्यवरांना असेच सहकार्य करत रहा अशी विनंती केली व त्यांचे आभार मानले.

गुप्तरोगाबाबत
काहीही लपवू नका



(रविवारी मोफत तपासणी)



डॉ. शेख ए.एच.

या अशा अडचणी असतात ज्या कोणाला सांगता येत नाहीत व न सांगितल्याने त्या वाढत जातात पण काळजी करू नका डॉक्टरपासून काहीही लपवू नये, ते आपले सर्व प्रश्न सहज सोडवितात. डॉ. शेख आजपर्यंत 200 पेक्षा अधिक पुरस्काराने सन्मानित, प्रचंड अनुभवी व अत्यंत माफक खर्चात इलाज करतात, आजपर्यंत लाखों पेशंटनी याचा अनुभव घेतलाय, आपली माहिती अत्यंत गुप्त ठेवली जाते, आयुर्वेदाने सर्व रोग नष्ट होतात, (रविवारी मोफत तपासणी).
आपल्या सर्व चिंताचा एकमेव उपाय म्हणजे डॉ. शेख यांचे नवजीवन आयुर्वेदीक डीस्पेंसरी. आजच भेट द्या व खात्री करा.

नवजीवन आयुर्वेदिक डिस्पेन्सरी

सेंट्रल बसस्टँड समोर, हॉटेल मिर्झा जवळ, औरंगाबाद.
फोन : (0240) 2350042, मो. : 9021111549 www.drshaikhah.in

# खुलताबादेत मोठ्या उत्साहाने 'ईद' साजरी

## ईद उल फित्रची वाजीब नमाज अदा

आधुनिक केसरी न्यूज

**खुलताबाद :** बुधवारी संध्याकाळी मुस्लिम बांधवांना चंद्रदर्शन झाल्या झाल्या एकच आनंद खुशी व्यक्त करत एकमेकांस चांद मुबरकच्या शुभेच्छा दिल्या व दि.११ गुरुवार ईद -उल -फित्र ची तयारी करुन लहान मोठे वयवृध्द सर्वच मुस्लिम बांधव नवनवीन कपडे सेंट अत्तर लावून ईदगाहात पोहचले.

शहरा लगत असलेल्या ईदगाहात गुरुवारी दि ११ सकाळी आठ वाजेदरम्यान सामुहिक ईद उल फित्र ची वाजीब नमाज अदा केली. पेश इमाम याहया यांनी नमाज व तदनंतर खुदबाचे वाचन करुन जागतिक तथा देश सर्वांसाठी दुआ केली तर शहरात बुरहानोद्दीन दर्गात नऊ वाजता सामुहिक ईद उल फित्र ची वाजीब नमाज अदा करण्यात आली येथे पेश इमाम हाफीज युसुफ यांनी नमाज व तदनंतर खुदबाचे वाचन करुन दुआ केली. गत तीस दिवसांपासून रखरखत्या उन्हात १४-१५ तासांचा कडक रोजा व दैनंदिन पाच वेळाची नमाज व रमजान बघता तराबीची वीस रकात नमाज अधिकची तर कुरान पठण तसबी ताहजुद इशराक अव्वाबीन चाश्त यासह सहेर इफ्तार करुन रमजानचे अर्कान तथा शबेकद्र इबादतची रात्र जी एक हजार महिन्याची एक रात्र आहे आदि प्रक्रिया करत रमजान महिना पुर्ण केला.

याची खुशी आनंद फक्त रोजेदार उपवास धारकांना अधिकाचा झाला व शेवटी माहे रमजानचे समारोप ईद उल फित्र वाजीब नमाज खुदबा तथा दुआ करण्यात आली. तर तद्नंतर हिंदू मुस्लिम एकता बघता विशेष करुन एकमेकांना आलिंगन देत ईद मुबारक शुभेच्छा व शुर्खुमाने तोंड गोड करत मोठा उत्साहाने ईद साजरी करण्यात आली.



# गारपीटग्रस्तांची दखल घेऊन तातडीची मदत घोषित करावी

## अन्यथा आंदोलन : भूमिपुत्र संघटनेचा इशारा


आधुनिक केसरी न्यूज

**वसंत पाटील**

**वाशिम :** लोकसभा निवडणुकीच्या तोंडावर शेतकऱ्यांच्या प्रश्नाला वाचा फोडण्याचा संकल्प नुकताच भूमिपुत्र शेतकरी संघटनेने केला आहे. त्यातच काल परवा जिल्ह्यातील काही भाग गारपिटीने झोडपून काढला आहे. परिणामी गारपीटग्रस्त भागात अपरिमित हानी झाली असून, बऱ्याच शेतकऱ्यांचे संसार उघड्यावर पडले आहेत. अशा बिकट परिस्थितीत सरकारने तातडीची आथिर्क मदत घोषित करून प्रत्यक्ष शेतकऱ्यांच्या खात्यात जमा करावी. अन्यथा आंदोलनाचे हत्यार उपसले जाईल असा इशारा भूमिपुत्रचे संस्थापक अध्यक्ष विष्णुपंत भुतेकर यांनी दिला आहे. लोकसभा निवडणूक आणि जिल्ह्यातील गारपीट या महत्त्वपूर्ण विषयाच्या अनुषंगाने भूमिपुत्र शेतकरी संघटनेकडून रिसोड स्थीत दत्तनगर येथे भूमिपुत्र च्या बैठकीचे आयोजन करण्यात आले होते. अध्यक्ष स्थानी भूमिपुत्र चे संस्थापक अध्यक्ष विष्णुपंत भुतेकर हे होते. प्रमुख मार्गदर्शक म्हणून जिल्हाध्यक्ष रामेश्वर आवचार, डॉ. गवळी, बाबाराव पाटील ढोणे, प्रा. बिलालसर यांची उपस्थिती होती. ग्रमीण भागात झालेल्या गारपीटग्रस्त शेतकऱ्यांना मदत मिळाली पाहीजे म्हणुन सरकार काय निर्णय घेते हे बघून पुढील अदोलंनाची दिशा निश्चित करणार आसल्याचे यावेळी विष्णुपंत भुतेकर यांनी सांगीतले. लोकसभा निवडणुकीत शेतकऱ्यांना योग्य दिशा देण्या साठी भूमिपुत्र कडुन 13 किंवा 14 एप्रिलला निर्णय घेण्यात येईल. बैठकीसाठी रिसोड तालुका, मालेगाव तालुका व हिंगोली जिल्ह्यातील पदाधिकारी, वाशिम तालुक्यातील कार्यकरते मोठया संखेने उपस्थित होते. बैठकीचे आयोजन भूमिपुत्रचे रिसोड शहर अध्यक्ष विकास झुंगरे व तालुका अध्यक्ष श्रीरंग नागरे यांनी केले होते.

# मविआच्या संवाद मेळाव्यास बहुसंख्येने उपस्थित राहावे : आ. अमित झनक

आधुनिक केसरी न्यूज





**रिसोड :** अकोला लोकसभा मतदारसंघातील काँग्रेसचे उमेदवार डॉ. अभय पाटील शनिवार दि.१३ एप्रील रोजी रिसोड येथे येणार आहेत. त्यानिमित्ताने मविआच्या कार्यकर्ता संवाद मेळाव्याचे आयोजन करण्यात आले आहे. सदर मेळाव्यास बहुसंख्येने उपस्थित राहण्याचे आवाहन रिसोड-मालेगाव विधानसभा मतदार संघाचे आमदार तथा वाशिम जिल्हा काँग्रेस कमिटीचेअध्यक्ष आ.अमित झनक यांनी केले आहे.

मालेगाव विधानसभा मतदार संघ हा अकोला लोकसभा मतदारसंघात समाविष्ट आहे. येत्या २६ एप्रील रोजी लोकसभा निवडणुकीची मतदान प्रक्रिया पार पडणार आहे. त्या अनुषंगाने प्रत्यक्ष प्रचाराला सुरुवात झाली नसली, तरी प्रचाराची आखणी करण्याच्या दृष्टिकोनातून सबंधित उमेदवार कार्यकर्त्यांसोबत संवाद साधत आहेत. त्याच धर्तीवर अकोला लोकसभा मतदारसंघाचे मविआचे अधिकृत उमेदवार डॉ. अभय पाटील रिसोड येथे येणार असल्याची माहिती आ. झनक यांनी दिली आहे. त्यानिमित्ताने रिसोड येथील बालाजी रिसॉर्ट वाशिम रोड येथे सकाळी ११ वा. संवाद मेळाव्याचे आयोजन करण्यात आले आहे. सदर मेळाव्यास तालुक्यातील काँगेस पदाधिकाऱ्यांसह, मविआतील सर्व घटक पक्षांच्या पदाधिकाऱ्यांची उपस्थिती राहणार आहे. त्या अनुषंगाने तालुक्यातील मविआच्या सर्व कार्यकर्त्यांनी बहुसंख्येने उपस्थित राहण्याचे आवाहन आ. अमित झनक यांनी केले आहे.

# पहूर येथे क्रांतिसूर्य महात्मा जोतीराव फुले यांची जयंती मोठ्या उत्साहात

आधुनिक केसरी न्यूज

**जामनेर :** तालुक्यातील पहूर येथे क्षत्रिय माळी समाज, महात्मा फुले जन्मोत्सव समिती यांच्या विद्यमाने क्रांतीसुर्य महात्मा फुले यांच्या जयंती उत्सवाचे आयोजन करण्यात आले होते. सर्वप्रथम महात्मा फुले मंगल कार्यालय येथील क्रांतीसुर्य महात्मा ज्योतिबा फुले सावित्रीबाई फुले यांच्या प्रतिमेला मान्यवरांच्या हस्ते पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले.

यावेळी क्रांतीसुर्य महात्मा फुले यांच्या जयंती निमित्त पहूर गावातून भव्य मिरवणूक काढण्यात आली मिरवणुकी मध्ये क्रांतीसुर्य महात्मा फुले यांचा रथ, अश्वारूढ छत्रपती शिवाजी महाराज यांच्या वेशभूषेत हर्षल सोनवणे, शिवाजी महाराज यांचे मावळे रोहीत क्षिरसागर , शिवा काळे ,क्रांतीसुर्य महात्मा फुले व सावित्रीबाई फूले यांच्या वेशभूषेत शिवाजी जाधव व चंद्रभागा बाई जाधव तर संत शिरोमणी सावता महाराज यांच्या वेशभूषेत दिपक बनकर, चोपदार भीमराव जाधव यांनी वेशभुषा परिधान करून मिरवणुकीचे लक्ष वेधून घेतले.

क्रांतीसुर्य महात्मा फुले यांची मिरवणूक महात्मा फूले मंगल कार्यालय तून सुरुवात करण्यात आली लेले नगर हनुमान मंदिर आर टि लेले हायस्कूल , बसस्टँड होळी चौक ,गढी चौक , येथुन भव्य दिव्य मिरवणूक काढण्यात आली व लहासे चौक येथे सेवानिवृत्त केंद्रप्रमुख रामचंद्र वानखेडे यांनी आपल्या मनोगतातून क्रांतीसुर्य महात्मा फुले यांच्या जिवन चरित्रावर प्रकाश टाकून कार्यक्रमाची सांगता करण्यात आली .

सदर मिरवणुकीला एकनाथ करवंदे , अक्षय जाधव व बापू बनकर यांनी



आपली बैलगाडी चे तर हनुमान मंदिर ट्रस्ट लेले नगर यांच्या कडून रथ व किशोर जाधव यांच्या कडून घोडा चे सहकार्य मिळाले. तर बाबूराव क्षिरसागर यांच्या कडून पाणी व्यवस्था करण्यात आली .यावेळी केंद्रीय माळी समाज सुधार मंडळ १६ गावचे अध्यक्ष बाबुराव आण्णा घोंगडे सचिव हरीभाऊ राऊत, सहसचिव दिपक जाधव महात्मा फुले माळी समाजाचे अध्यक्ष लक्ष्मण गोरे, उपाध्यक्ष ज्ञानेश्वर करवंदे , सचिव विकास उबाळे , सदस्य डॉ जितेंद्र घोगंडे ,विष्णू घोंगडे , दत्तू जाधव , बाबुराव पवार ,नाना चौथे ,महात्मा फुले जन्मोत्सव समितीचे अध्यक्ष दुर्गादास जाधव, उपाध्यक्ष ईश्वर हिवाळे ,सचिव तुषार बनकर, रोशन चौधरी, नितीन जाधव, जामनेर मार्केट कमिटी सचिव वासुदेव घोंगडे, सरपंच शंकर जाधव, उपसरपंच राजु जाधव, माजी उपसरपंच योगेश भंडागे, ग्रां. प. सदस्य शिवाजी राऊत , विक्रम घोंगडे , विठ्ठल मंदिर ट्रस्टचे सचिव राजू जाधव, राजधर पांढरे, समाधान पाटील, गजानन सोनवणे, राजेंद्र सोनवणे, गणेश भडांगे, अर्जून सोनवणे, देवेंद्र घोंगडे, विजय बनकर, राहूल ढेगांळे, रुपेश बनकर, गणेश भंडागे, अर्जून सोनवणे, हर्षल घोंगडे, वैभव लहासे डिगंबर चौधरी, सोपान लहासे, प्रकाश जाधव , अतूल लहासे, वासुदेव गायकवाड, अमोल चौधरी, संदिप क्षिरसागर, प्रदिप द्राक्षे, समाज पंच मंडळी, ग्रामपंचायत सदस्य , बहुसंख्य समाज मोठ्या संख्येने उपस्थित होता. सुत्रसंचलन हरीभाऊ राऊत यांनी केले तर आभार ज्ञानेश्वर करवंदे यांनी मानले तर क्रांतीसुर्य महात्मा फुले जन्मोत्सव समितीचे सर्व सदस्याचे सहकार्य लाभले.

# महात्मा फुले, डॉ. बाबासाहेब आंबेडकर जयंतीनिमित्त आरोग्य, रक्तदान शिबिर

## विविध समाजातील युवकांनी केले रक्तदान

आधुनिक केसरी न्यूज

**रिसोड :** क्रांतीसुर्य महात्मा ज्योतिबा फुले व भारतरत्न डॉ बाबासाहेब आंबेडकर यांच्या जयंतीनिमित्त विठाई मायनॉरिटी बहुउद्देशीय प्रतिष्ठान व RA-1 मित्र मंडळाच्या वतिने आरोग्य शिबीर व रक्तदान शिबीराचे आयोजन करण्यात आले होते. विविध समाजातील युवकांनी रक्तदान करून मोलाचे सहकार्य केले व अनेक नागरिकांनी आरोग्य शिबीराचा लाभ घेतला शिबीरा मध्ये इसिजी, शुजर, बिपी व आरोग्य तपासणी करण्यात आली. यावेळी उपस्थित आमदार अमित झनक, इंजीनियर बाळासाहेब देशमुख,डॉ देवळे हॉस्पिटलचे डॉ नरवाडे, डॉ सरनाईक, नितीन बनसोडे, महाराष्ट्र राज्य पत्रकार संघाचे जिल्हाअध्यक्ष निनाद देशमुख, खरेदी विक्री संघाचे संचालक डॉ रविंद्र मोरे पाटील, बबनराव गारडे, कृषी उत्पन्न बाजार समिती चे संचालक भिमराव शेजुळ, प्रताप दादा मोरे, केशवराव संभादिडे, गणेश देगावकर, केशव गरकळ, अशोक चोपडे, प्रल्हाद कोकाटे, डॉ. रामेश्वर रंजवे, भागवतराव गाभणे, खंडु इरतकर,सागर डांगे, रायभान जुमडे, रामा इरतकर, गोपाल मोरे, प्रदिप खंडारे, दिलीप चोपडे, गोपाल इरतकर, सचिन गांजरे, रोहित दांदडे, शिवराज जहिरव, माया मोरे, विर जुमडे, भागवत जुमडे, अजय तिडके,संतोष जुमडे, विशाल जुमडे, विजय जाधव, अमित जुमडे,शुभम सांवत, गोपाल फुके, आकाश जुमडे, निलेश पंडीत, बंटी जुमडे, विकास मोरे, सागर जुमडे,राजु जुमडे, कुंदन जुमडे, रोहित पंडीत, अनिकेत पंडीत, आकाश मोरे, अमर पोहरे, आकाश जाधव, गोलु जुमडे, आकाश पंडीत आदि मान्यवर व RA-1 मित्र मंडळाचे पदाधिकारी उपस्थित होते.

# पाडेगाव येथे जयंती महोत्सवात अंनिसचा कार्यक्रम संपन्न

आधुनिक केसरी न्यूज

**सुशिल गायकवाड**

**लोणंद :** महापुरुष जयंती महोत्सवाच्या अनुषंगाने पाडेगाव विकास फाउंडेशनच्या वतीने अंधश्रद्धा निर्मूलन समितीच्या पदाधिकाऱ्यांना आमंत्रित करण्यात आले होते.यावेळी फलटण शाखेच्या वतीने कार्यक्रमातून विशेष मार्गदर्शन करण्यात आले.चमत्कार मागील विज्ञान सादरीकरण व विधवा प्रथा बंद प्रबोधन करण्यासाठी व्याख्यान व मनोरंजनातून सादरीकरण राज्य कार्यकारिणी सदस्य प्रशांत पोतदार,हंसराव धुमाळ आणि मंदाकिनी गायकवाड यांनी केले.मोहिनी भोंगळे, रोहित भोंगळे,हर्षाली पोतदार,विर पोतदार,मानस पोतदार,अनुसया सावंत आदी कार्यकर्ते या उपक्रमात सहभागी झाले.विर पोतदार आणि मंदाकिनी गायकवाड यांनी प्रबोधन करण्यासाठी गाणी गायली.बुवा बाजी,मांत्रिक,देवऋषी,भोंदूगिरी करण्यासाठी चमत्कार कसे करतात व भोळ्या भाबड्या देवाधर्माच्या नावाखाली लोकांना कसे फसवतात याची प्रात्यक्षिके प्रशांत पोतदार आणि हंसराज धुमाळ यांनी सादर केली.मंदाकिनी गायकवाड यांनी म्हटले की,महिलेचा पति अपघातात किंवा आजारपणामुळे निधन झाले तर महिलेची चुक नसताना ती अशुभ पापी अशा दृष्टीने त्या महिलेकडे पाहिले जाते.पुरुष हे घाणेरडया नजरेने पाहिले जाते.तसेच तिला हळदीकुंकू लावण्यासाठी महिलांकडून डावललं जातं.तिच्या मुलांच्या लग्नात मानसन्मान दिला जात नाही. नवरा मेला की तिचं अभुषणे मंगळसूत्र बांगड्या तोडल्या जातात.व जोडवी काढली जातात. कुंकू पुसले जातं,महिला दुःखी असताना आभाळ कोसळत असताना महिलाच महिलेला ओरबाडून काढते.महिलेच्या मनावर खोलवर आघात होतो. महिला स्वतः ला कमनशिबी समजते.न्युनगंड निर्माण झाले की ती आयुष्यभर मरण यातना सहन करते.तिला शुभकार्यात घेतले जातं नाही.त्यामुळे तिच्या जगण्याचा आनंद हिरावून घेतला जातो.



विधवा प्रथा बंद प्रबोधन करण्यासाठी शासनाने जीआर काढला आहे.हे सुद्धा मंदाकिनी गायकवाड यांनी सांगितले.हा कार्यक्रम घेण्यासाठी गिरिश बनकर यांनी अतिशय चांगले सहकार्य केले.याबद्दल अंनिस फलटण शाखेच्या वतीने विशेष आभार व्यक्त करण्यात आले.मंदाकिनी गायकवाड यांनी विधवा प्रथा बंद यासाठी महिलांकडून शपथ वाचून घेतली.यावेळी पुस्तकाचा स्टॉल ही लावण्यात आला होता.कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रभाकर नेवसे यांनी केले.पाडेगाव सामाजिक विकास फाउंडेशनचे सर्व पदाधिकारी व कार्यकर्ते तसेच विद्यार्थी आणि ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते.




# मनपा शाळा एन-७ तर्फे मतदान जनजागृती मोहीम

आधुनिक केसरी न्यूज

**छत्रपती संभाजीनगर :** महानगरपालिका केंद्रीय प्राथमिक व माध्यमिक विद्यालय एन-७ सिडको छत्रपती संभाजीनगर शाळेत मतदान जनजागृती मोहिमेंतर्गत पालक सभा आयोजित करण्यात आली होती. पालक सभेतील पालकांना शाळेचे मुख्याध्यापक माननीय श्री शेख अहमद पटेल सर यांनी मार्गदर्शन केले. मतदान जनजागृती संदर्भात पालकांना शपथ देण्यात आली. मतदान जनजागृती करण्यासाठी विद्यार्थ्यांची प्रभात फेरी काढण्यात आली. सदरील कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी श्रीमती सुनंदा आरदवाड, श्रीमती अनिता शेटे, मा.श्रीमती संगीता आंबेकर, श्रीमती मंगल महाजन, मा. श्रीमती अंजली कुलकर्णी, श्रीमती वैशाली सुरडकर, मा. श्रीमती सुनिता पाटील, मनोज अग्रवाल, श्रीमती दिपाली औटे, श्रीमती शिल्पा बहुरे, वेंकट जाधव, श्रीमती मंजुश्री राठोड, श्रीमती वैशाली देशमुख, श्री दीपक पडोळ, श्रीमती संपदा शिंदे,श्रीमती वंदना सुरडकर, श्रीमती पुष्पा दाभाडे, श्रीमती नादेरा सय्यद, श्रीमती फिरदोस नदाफ, श्रीमती सबा सिद्दिकी, श्रीमती अंजली देशपांडे, सय्यद इरफान या शिक्षकांनी व रमेश देवडे, विजय गायकवाड, श्रीमती रेखा नाटेकर या सेवकांनी सहकार्य केले.

# अपुऱ्या स्वच्छतागृहांमुळे महिलांची कुचंबणा

आधुनिक केसरी न्यूज

**मुंबई :** मध्य रेल्वे प्रशासन रेल्वे स्थानकांत महिलांसाठी उच्च दर्जाची स्वच्छतागृहे उपलब्ध करीत असतानाच, दुसरीकडे सीएसएमटी स्थानकातील स्वच्छतागृहे बंद केली जात आहेत. महिलांसाठी दूरवर गर्दीच्या ठिकाणी पर्यायी स्वच्छतागृह उपलब्ध करण्यात आले असून महिलांना तिथवर जाऊन स्वच्छतागृहांच्या रांगेत उभे राहावे लागत आहे.

त्यामुळे महिला प्रवाशांची प्रचंड कुचंबणा होत आहे.पुरुषांचे स्वच्छतागृह बंद करून वातानुकूलित स्वच्छतागृहे सुरू करण्यात आली आहेत. मात्र, सीएसएमटीवरील प्रवाशांच्या गर्दीच्या तुलनेत ही स्वच्छतागृहे अपुरी पडत आहेत. परिणामी, स्वच्छतागृहात जाण्यासाठी प्रवाशांना १० ते १५ मिनिटे रांगेत उभे राहावे लागते. यामुळे मधुमेह, मूत्रपिंड विकार असलेल्या प्रवाशांचे प्रचंड हाल होत आहेत. मध्य रेल्वेवरील सर्वाधिक वर्दळीच्या स्थानकांपैकी एक असलेल्या सीएसएमटी येथून दररोज ११ लाखांहून अधिक प्रवासी प्रवास करतात. हजारो प्रवासी सीएसएमटी स्थानकावरील फलाट क्रमांक ५ – ६ समोरील स्वच्छतागृहाचा वापर करतात. पुरुषांसाठी जानेवारी २०२४ मध्ये वातानुकूलित स्वच्छतागृह खुले करण्यात आले. त्यामुळे पुरुषांना वातानुकूलित आणि सर्वसाधारण अशी दोन स्वच्छतागृहे उपलब्ध झाली. मात्र काही दिवसांपूर्वी अचानक महिलांचे आणि पुरुषांचे सर्वसाधारण स्वच्छतागृह बंद करण्यात आले. पुरुषांना वातानुकूलित स्वच्छतागृहाचा पर्याय उपलब्ध आहे. मात्र, स्थानकावरील गर्दी लक्षात घेता स्वच्छतागृहात जाण्यासाठी हजारो प्रवाशांना रांगेत उभे राहावे लागत आहे. मध्य रेल्वे प्रशासनाने प्रवाशांसाठी आवश्यकतेनुसार स्वच्छतागृहाची उभारणी करणे गरजेचे असताना आलिशान स्वच्छतागृहे उभारण्यात आली. यामुळे एकाच वेळी शेकडो प्रवाशांची गर्दी स्वच्छतागृहात होते. शिवाय वृद्ध, मधुमेहग्रस्त, मूत्रपिंड विकाराने त्रस्त प्रवाशांची गैरसोय होत आहे. उपनगरीय रेल्वेगाड्यांमधून प्रवास करणाऱ्या महिलांसाठी सीएसएमटीच्या फलाट क्रमांक ५-६ वर स्वच्छगृहाची सोय होती. मात्र, ते महिलांना कोणतीही पूर्वसूचना न देता अचानक बंद करण्यात आले.

# राज्यात सर्वाधिक मतदार पुणे जिल्ह्यात

आधुनिक केसरी न्यूज



**पुणे :** लोकसभा निवडणुकीत महाराष्ट्राच्या ४८ मतदारसंघांतील सुमारे सव्वानऊ कोटी मतदार मतदानाचा हक्क बजावणार असून मतदारांची सर्वाधिक संख्या पुणे जिल्ह्यात आहे. तर नंदूरबार, गोंदिया, रत्नागिरी आणि सिंधुदुर्ग या चार जिल्ह्यांत महिला मतदारांची संख्या अधिक असून त्या सर्वांनी मतदानाचा हक्क बजावला तर त्यांची मते निकालावर प्रभाव पाडू शकतात.

राज्यात ८ एप्रिलपर्यंत एकूण नऊ कोटी २४ लाख ९१ हजार ८०६ मतदारांची नोंद झाली आहे. यामध्ये चार कोटी ८० लाख ८१ हजार ६३८ पुरुष, चार कोटी ४४ लाख चार हजार ५५१ महिला आणि ५६१७ तृतीयपंथी मतदार आहेत. पुणे जिल्ह्यात सर्वाधिक ८२ लाख ८२ हजार ३६३ मतदार आहेत. त्याखालोखाल मुंबई उपनगरात ७३ लाख ५६ हजार ५९६, ठाणे जिल्ह्यात ६५ लाख ७९ हजार ५८८, नाशिक ४८ लाख आठ हजार ४९९, तर नागपूर जिल्ह्यात ४२ लाख ७२ हजार ३६६ मतदार आहेत. रत्नागिरी, नंदूरबार, गोंदिया आणि सिंधुदुर्ग जिल्ह्यांत महिला मतदारांची संख्या अधिक आहे. नगर, सोलापूर, जळगाव, कोल्हापूर आणि छत्रपती संभाजीनगर या पाच जिल्ह्यांमध्ये ३० लाखांहून अधिक मतदार आहेत. नगरमध्ये ३६ लाख ४७ हजार २५२, सोलापूर जिल्ह्यात ३६ लाख ४७ हजार १४१, जळगावमध्ये ३५ लाख २२ हजार २८९ मतदार आहेत. कोल्हापूर जिल्ह्यातील मतदारसंख्या ३१ लाख ७२ हजार ७९७ तर छत्रपती संभाजीनगरमध्ये ३० लाख ४८ हजार ४४५ मतदार आहेत. याशिवाय बुलढाणा, अमरावती, यवतमाळ, नांदेड, रायगड, मुंबई शहर, बीड, सातारा, सांगली आणि पालघर या दहा जिल्ह्यांमध्ये २० लाखांहून अधिक मतदार आहेत, असे निवडणूक आयोगाकडून सांगण्यात आले.



# अशा प्रकारच्या जयंत्या संपूर्ण राज्यात साजऱ्या व्हायला हव्या : आ. चव्हाण

## आमदारांकडून पाडेगाव सामाजिक विकास फाऊंडेशनचे कौतुक

आधुनिक केसरी न्यूज

**सुशिल गायकवाड**

**लोणंद :** पाडेगाव सामाजिक विकास फाऊंडेशन यांच्या वतीने आयोजित करण्यात आलेल्या महापुरुष जयंती महोत्सवाचे उदघाट्न फलटण कोरेगाव विधानसभा मतदार संघाचे विद्यमान आमदार दिपकराव चव्हाण यांच्या प्रमुख उपस्थितीत करण्यात आले. यावेळी ग्रंथदिंडी काढण्यात आली. सर्वच महापुरुषांच्या प्रतिमांना पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले.

यावेळी आ.दिपकराव चव्हाण यांनी संत तुकाराम यांचा विद्रोही अभंग गात पुरोगामीत्वाची झलक दाखविली.तुका म्हणे तूम्ही निरविल्या वरी हा संत तुकारामांचा अभंग गात आमदार दिपकराव चव्हाण हे स्वतः किर्तनात दंग झाले.

यावेळी या अभंगाबद्दल सर्वांनीच विशेष समाधान व्यक्त केले.

यावेळी आमदार दिपकराव चव्हाण यांनी मनोगत व्यक्त केले. महिलांना आजही सामानतेची वागणूक द्यायला आपण कमी पडतोय. फुले दांपत्याने शोषणाविरुद्धच्या केलेल्या अनेक क्रांतिकारी चळवळीची आठवण यावेळी त्यांनी करून दिली व महापुरुषांच्या विचारांची जयंती पाडेगाव सामाजिक विकास फाऊंडेशन साजरे करतय असे गौरवोदगार सुद्धा त्यांनी काढले. अशा प्रकारच्या जयंत्या संपूर्ण राज्यात साजऱ्या व्हायला हव्यात अशी अपेक्षाही आ.दिपकराव चव्हाण यांनी व्यक्त केली. महात्मा फुलेंचा जीवनपट उलघडत असताना त्यांच्या संघर्षाची प्रेरणा आजच्या तरुणांनी घेतली पाहिजे.असे प्रतिपादन बाबासाहेब खरात यांनी केले.महापुरूषांची जयंती ही त्यांच्या विचारांना अभिप्रेत अशा पद्धतीनेच साजरी झाली पाहिजे. अगडबंब खर्च करून डीजेचा दणदणाट आणि झगमगाट करून जयंती साजरी करणं म्हणजे द्रव्याचा निरर्थक वापर करणं होय, असे प्रतिपादन पाडेगाव सामाजिक विकास फाऊंडेशनचे संस्थापक अध्यक्ष गिरीश बनकर यांनी केले.

यावेळी मान्यवरांचे स्वागत सत्कार पाडेगावचे माजी सरपंच राजुनाना नेवसे यांनी केले तर प्रास्ताविक व आभार गिरीश बनकर यांनी केले.

यावेळी पाडेगावचे लोकनियुक्त सरपंच राहुल कोकरे, सदस्य हेमंत सुतार, पाडेगाव वि वि कार्यकारी सोसायटीचे चेअरमन विजय खरात, संचालक हणमंत गोरे, माजी सरपंच राजुनाना नेवसे, ग्रामपंचायत माजी बाबासाहेब खरात, बिपीन मोहिते, नितीन जगताप, ह. भ. प सचिनमहाराज महामुनी, तुळशीराम ताम्हाणे, सोमनाथ गाडे,प्रशांत ढावरे,दिपक सुतार, गुलाब नेवसे, महेश ढावरे, संदेश नेवसे, दिनेश अडसूळ,रोहित नेवसे रोहन ढावरे, प्रतिक नेवसे, प्रज्वल नेवसे,कुणाल नेवसे आदी मान्यवर उपस्थित होते.


शहरातील विश्वसनीय बिग सुपर मार्केट

महावीर घर संसार



किराणा | सुका मेवा | मसाले | क्रॉकरी

प्लास्टिकच्या वस्तू | स्टीलच्या वस्तू | अॅल्युमिनियमच्या वस्तू

घरगुती उपकरणे | साफ सफाईचे सर्व साहित्य | आणि बरेच काही

सुमित 7620111118 राजेश जैन 7588348738

रमेश जैन (क्रॉकरी) 9860481142 7620111117

व्हॉट्सअपवर ऑर्डरसाठी 9850017181

वितरण स्थितीसाठी 9021395308

घाऊक चौकशीसाठी 7620111118

www.mahavirbestprice.com sumitparakh73@gmail.com

S.P. रोड, चेलीपुरा, शहागंज, छत्रपती संभाजीनगर

प्लॉट क्रमांक A25, MIDC पोलिस स्टेशन समोर, चिकलठाणा, छत्रपती संभाजीनगर

# वालसेकर, शेजूळ, जैस्वाल, पवार व मृण्मयी जोशी यांना साबळे स्मृती पुरस्कार प्रदान

आधुनिक केसरी न्यूज

**छत्रपती संभाजीनगर :** कालकथीत भीमराव साबळे स्मृती प्रित्यर्थ विविध क्षेत्रात उल्लेखनीय कार्य करणाऱ्याना यावर्षी पासून पुरस्कार सुरु करण्यात आले व त्यासाठी यावर्षी उत्कृष्ट पत्रकारिता पुरस्कार एमसीएनचे मुख्य संपादक देव शेजूळ यांना, उत्कृष्ट उद्योजक पुरस्कार वालसेकर मेटल इंडस्ट्रीचे संस्थापक चंद्रकांत वालसेकर यांना, उत्कृष्ट समाजसेवा पुरस्कार राजू भाऊ जैस्वाल यांना, उत्कृष्ट शिक्षक पुरस्कार पृथ्वीराज रामदेव पवार यांना तर उत्कृष्ट क्रीडा पुरस्कार राष्ट्रीय टेनिसपटू मृण्मयी मनोज जोशी संभाजीनगर यांना एका शानदार सोहळ्यात देण्यात आले. या पुरस्कार सोहळ्याचे प्रमुख पाहुणे म्हणून प्रवीण विलास शिशुपाल, कार्यासन अधिकारी मुंबई मंत्रालय हे होते व शिक्षण महर्षी दादासाहेब म्हस्के यांच्या शुभहस्ते पुरस्कार वितरण करण्यात आले. या कार्यक्रमाचे आयोजन नागसेन मागासवर्गीय औद्योगिक सहकारी संस्थेचे अध्यक्ष महादेव भिमराव साबळे यांनी केले होते.

शिक्षण महर्षी दादासाहेब म्हस्के यांनी आपल्या मार्गदर्शनपर भाषणात सांगितले की महादेव साबळे यांनी त्यांच्या वडिलांचे स्वप्न पूर्ण केले याचा मला आनंद आहे, भीमराव साबळे हे अतिशय कष्टाळू व्यक्तिमत्व होते, आपला समाज पुढे यावा यासाठी त्यांनी खूप मेहनत घेतली व आज आपल्या समाजातील अनेक उद्योजकांकडे बघून समाजाचे भवितव्य उज्वल होत आहे असे सांगितले.

हा पुरस्कार आमच्यासाठी प्रेरणा देणारा आहे यामुळे यापुढे आम्ही अधिक जोमाने काम करू असे पुरस्कार्थिनी यावेळी सांगितले.

हा कार्यक्रम कुलस्वामिनी मंगल कार्यालय येथे संपन्न झाला. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन अँकर भावना यांनी उत्कृष्टरित्या पार पाडले.

या कार्यक्रमात कृष्णा भंडारी, किशोर गडकर, दामू आण्णा कांबळे,नागेश जावळे, किशोर दामोदर, नंदु वाकेकर, मुकेश गायकवाड, मनोज पारधे, शेखर ढोले, मनोज सरीन, स्वप्निल जाधव हिरालाल साबळे, प्रथमेश साबळे, प्रतीक साबळे, सुधाकर गंगावणे, राजू गायकवाड, विनोद गडकरी, राजू बर्डे, आनंद पगारे, प्रियाआनंद



पगारे, मिलिंद आठवले, शीलवंत गोपनारायण यांच्यासह रंजना पगारे, अंजली भुईगड, प्रियांका पगारे, मयुरी पगारे, रेखा, प्रियांका किशोर दामोदर, महादेव साबळे ममता शेजवळ, अश्विनी पंडित, सरनम साबळे, मानस साबळे, स्वाती जाधव, यश पगारे आणि विविध क्षेत्रातील महिला उपस्थित होत्या. कार्यक्रमाच्या आभार प्रदर्शनाची जवाबदारी विलास जोगदंडे यांनी पार पाडली.

## सिल्लोड येथे महिला समुपदेशन केंद्रात महात्मा जोतीबा फुले जयंती उत्साहात संपन्न

आधुनिक केसरी न्यूज

**सिल्लोड :** येथे महिला समुपदेशन केंद्र सिल्लोड पोलिस स्टेशन शहर आवार तालुका सिल्लोड जिल्हा छत्रपती संभाजी नगर येथे महात्मा ज्योतिबा फुले यांची जयंती उत्साहाने साजरी करण्यात आली. यावेळी शहर पोलिस स्टेशन चे उपविभगिय अधिकारी श्री कोल्हे साहेब यांची उपस्थिती होती. उपविभागीय अधिकारी श्री कोल्हे साहेब यांनी महात्मा ज्योतिबा फुले यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून अभिवादन केले. तसेच सिल्लोड शहर पोलिस स्टेशन चे पी आय उदार साहेब. ग्रामीण पोलिस स्टेशन चे राजपूत साहेब. पी एस आय झिंजुर्डे साहेब व पी एस आय क्षीरसागर साहेब यांनी देखील महात्मा ज्योतिबा फुले यांच्या प्रतिमेचे पूजन करून प्रतीमेस अभिवादन केले. शहर व ग्रामीण पोलिस स्टेशन चे संपूर्ण कर्मचारी यावेळी हजार होते. प्रतिमेचे पूजन झाल्यानंतर उपविभागीय अधिकारी श्री कोल्हे सर यांनी आपले मनोगत व्यक्त केले त्यांनी महात्मा ज्योतिबा फुले यांच्या जीवन कार्यावर प्रकाश टाकत भाषणाला सुरवात केली. त्यांचे जीवनकार्य तसेच त्यांनी स्त्रियांच्या शिक्षणासाठी दिलेला लढा खूप महत्त्व पूर्ण आहे असे त्यांनी सांगितले. तसेच आजच्या काळात चालणारे शेअर मार्केट चे व्यवस्थापन महात्मा जोतिबा फुले यांचे कसे होते याबाबत सांगितले. पुणे येथे असलेले खडकवासला धरण याच्या बांधणीत देखील महात्मा जोतिबा फुले यांचा महत्त्वपूर्ण वाटा आहे असे सांगितले. तसेच स्त्री शिक्षण शेतकऱ्यांच्या प्रश्नासाठी त्यांनी इंग्रज सरकारला केलेले प्रश्न याबाबत सांगितले. महात्मा जोतिबा फुले यांचा आदर्श सर्वांनी घ्यावा असे सांगितले. तसेच शेवटी महात्मा ज्योतिबा फुले यांच्या जयंती निमित्त सर्वांना शुभेच्छा दिल्या. यावेळी शहर पोलिस स्टेशन चे कर्मचारी सोनवणे मॅडम ग्रामीण पोलिस स्टेशन चे जाधव सर, राठोड सर, पाटील सर, आरके सर, तळेकर सर,पोलिस बॉईज संघटनेचे अध्यक्ष ॲडव्होकेट गौर सर सोनार सर बार्टीचे समतादूत मनोहर अपार व उमाकांत बोर्ड तसेच महिला समुपदेशन केंद्राचे समुपदेशक आरती जाधव व समुपदेशक विशाल पाईकराव तसेच आदी कर्मचारी यांची उपस्थिती होती. शेवटी समुपदेशक विशाल पाईकराव यांनी सर्वांचे आभार मानले..





## मतदार जनजागृतीसाठी प्रभात फेरीचे आयोजन

आधुनिक केसरी न्यूज

**बि. डी. रामपूरकर**

**जिंतूर :** ११ एप्रिल रोजी जिंतूर तालुक्यातील सर्व शाळांमध्ये प्रभातफेरीच्या माध्यमातून मतदार जनजागृती करण्यात आली. तसेच शाळा व्यवस्थापन समितीच्या बैठकीमध्ये मतदार जनजागृती संदर्भातील जिल्हाधिकारी तथा जिल्हा निवडणूक अधिकारी यांचा ऑडिओ संदेश ऐकवण्यात आला. भारतीय निवडणूक आयोग यांच्या निर्देशानुसार जिल्हाधिकारी तथा निवडणूक निर्णय अधिकारी रघुनाथ गावडे, जिल्हास्तरीय स्वीप नोडल अधिकारी गणेश शिंदे, सहाय्यक निवडणूक निर्णय अधिकारी श्रीमती संगीता सानप, तहसीलदार जिंतूर तथा 95 जिंतूर सहाय्यक निवडणूक निर्णय अधिकारी राजेश सरवदे, तहसीलदार सेलू तथा 95 जिंतूर सहाय्यक निवडणूक निर्णय अधिकारी दिनेश झांपले, मतदार जनजागृती व सहभाग कार्यक्रमाचे नोडल अधिकारी तथा गटशिक्षणाधिकारी त्र्यंबक पोले, नायब तहसीलदार निवडणूक सुग्रीव मुंडे यांच्या नियोजनानुसार मतदार जनजागृती कार्यक्रम सुरू आहे. आज तालुक्यातील सर्व शाळेमध्ये शाळा व्यवस्थापन समिती बैठकीत निवडणूक साक्षरता समिती (ELC) स्थापन करणे किंवा स्थापन केलेल्या ELC मार्फत मतदार जनजागृती कार्यक्रमाचे आयोजन करणे. मतदार जनजागृती विषयावर विविध स्पर्धा (रांगोळी, चित्रकला, वक्तृत्व, पथनाट्य, नाटीका) घेण्यात याव्यात असे सांगण्यात आले. तसेच आज मतदार जनजागृती संदर्भातील (मतदार राजा जागा हो, लोकशाहीचा धागा हो.... चला आपला देश घडवूया, सर्वांनी मतदान करूया.... मतदान आमचा हक्क आहे, आम्ही तो बजावणार.... मतदान करा, मतदान करा....) या घोषवाक्यसह प्रभातफेरीचे आयोजन करण्यात आले. एकूणच सर्व मतदारांना असे आवाहन करण्यात आले की, उत्सव लोकशाहीचा, अभिमान देशाचा अशी भावना मनात ठेवून दिनांक 26/04/2024 रोजी सकाळी 07 ते संध्याकाळी 06 या वेळेत सर्व मतदारांनी मतदान केंद्रावर जाऊन मतदान करावे. शाळा व्यवस्थापन समिती बैठक व प्रभातफेरीच्या आयोजनासाठी स्वीप सदस्य ज्ञानोबा साबळे, मंगेश नरवाडे, मारोती घुगे, देवानंद सावंत, दिनकर घुगे, शंकर दांडगे, राजेंद्र ढाकणे, मयूर जोशी, राजेंद्र कांगणे यांनी मेहनत घेतली.

## २५ टक्के ऑनलाईन प्रवेशासाठी मार्गदर्शक सूचना

आधुनिक केसरी न्यूज

**जैनुल आबेद्दीन**

**मेहकर :** बालकांचा मोफत व सक्तीच्या शिक्षणाचा अधिकार अधिनियम २००९ नुसार सन २०२४-२५ या शैक्षणिक सत्रासाठी आरटीई २५ टक्के ऑनलाईन प्रवेश प्रक्रियेबाबत प्राथमिक शिक्षण संचालनालयाने मार्गदर्शक सूचना जारी केल्या आहेत. सर्व सूचनांचे काटेकोरपणे पालन करून त्यांची अंमलबजावणी करण्यात यावी, असे सूचवले आहे. आरटीई प्रवेशासाठी विद्यार्थी नोंदणीची प्रक्रिया पुढील आठवड्यात सुरू होण्याची शक्यता आहे. शिक्षणाच्या अधिकारानुसार या शैक्षणिक वर्षासाठी आरटीई २५ टक्के प्रवेश प्रक्रियेचाबत मार्गदर्शक सूचनांची अंमलबजावणी करावी. सर्व शाळांचा समावेश आरटीई प्रवेश प्रक्रियेत वंचित, दुर्बल, सामाजिक व शैक्षणिकदृष्ट्या



मागासवर्ग घटकातील मुलांना आहे. आरटीई अंतर्गत २५ टक्के राखीव जागावरील प्रवेश प्रक्रियेबाबत प्रवेशासाठी प्राधान्यक्रम ठरवताना विद्यार्थ्यांच्या निवासस्थानापासून एक किलो मीटरपर्यंतच्या अंतरावर अनुदानित शाळा, शासकीय शाळा, स्थानिक स्वराज्य संस्थांच्या शाळा व स्वंय अर्थसहाय्यित शाळा अशा सर्व शाळांचा समावेश या प्रक्रियेसाठी आहे. ज्या बालकांनी यापूर्वी आरटीई अंतर्गत शाळेत प्रवेश घेतला आहे, अशा बालकांना पुन्हा अर्ज करता येणार नाही. प्रवेशासाठी चुकीची माहिती दिली तर संबंधित बालकाचा प्रवेश रद्द करण्यात येईल. पालकांनी एकच परिपूर्ण अर्ज भरावा. अनेक अर्ज भरल्याचे निदर्शनास आल्यास हे अर्ज लॉटरीसाठी विचारात घेतले जाणार नाहीत. अशा पालकांचे अर्ज रद्द करण्यात येतील, याची नोंद घेण्यात यावी.

## जिंतुरात रमजान ईद उत्साहात साजरी

आधुनिक केसरी न्यूज

**बि. डी. रामपूरकर**

**जिंतुर :** दि. 11 रोजी वार गुरुवार जिंतूर येथील मुस्लीम समाज बांधव पवित्र रमजान महिना एक महिनाभर उपासना करुण मोठ्या संख्येने उपस्थित इंदगाहावर हजारो सख्यने नमाज पठण करण्यासाठी एकत्र येऊन नमाज पठण करत असतात ईद ही मोठा संन असल्याने रमजान ईद उत्साहात साजरी केली जाते पावित्र रमजान महिन्याचे उपवास सुरु होताच तेव्हापासून पोलीस निरीक्षक नैतुव मध्य बंदोबस्त तैनात करण्यात येतो एक महिना शिस्त वर रहदारी मध्य अडथळे होऊ नये यासाठी व्यापारी याना अडथळे निर्माण होऊ नये दक्षता घेउन पोलीस अधिकारी कर्मचारी सर्व समाज बांधव कोणत्याही समाजाला मनात संकोच केला जाऊ नये जिंतूर पोलीस निरीक्षक बुंधिराज सुकाळे चागल्या प्रकारे बंदोबस्त केला व कोणत्याही समाजाचे सन असल्यास त्यांनी आपल्या स्वतःहांच्या कुटुंबात न राहता आपली ड्युटी बजावत असतात या बाबी लक्षात घेऊन जातीय सलोखा राहावं जिंतूर नुरानी कमिटी कडून उपस्थीत बंदोबस्त पोलीस निरीक्षक व त्यांच्या सहकारी पोलीस प्रशासन कर्मचारी व इंदगाह कमिटी चे अध्यक्ष जलील मौलाना , तंजमुल मौलाना , मिर्झा जाकेर बेग याचा सत्कार करण्यात आले उपस्थितीत नुराणी कमिटीचे सदर जहीर, भाई, फेरोज भाई, युसूबभाई ,मकसद मौलाना, माबुदभाई बामणीकर, सलीम भाई, साबिर भाई, जाहिद भाई, अत्तर हाजी साहब, मोहम्मद राजू, रफिक पत्रकार, सि राज पत्रकार, नजर मुला, मौजूद कारपेंटर, मकसूद जमदार , हादि जमदार, सुफुयान, आदी नागरीक जेष्ठ उपस्थीत होते.

